म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. २५२६

॥ श्रीगणराज समर्थ ॥

॥ श्रीभूमिस्वानंद नाथो मयूरेशः समर्थः ॥



नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्या प्रदायिने ।
यस्यागस्त्यायते नाम विघ्न सागर शोषणे ॥१॥

ध्यायेत् स्थिरेण चित्तेन गणेशं सर्वसिद्धिदम् ।
बुद्धि प्रकाशकं पूर्ण योगिनां हृदि संस्थितम् ॥२॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
... ह्म स्तस्मै श्रीगुरवे नमः ॥३॥

REFBK-0025023
REFBK-0025023

# "काव्य संग्रह"

## षष्टब्दी पूर्ति- अनुभव ज्ञान प्रचार

२५२६
१५यघ्१५
२५०२३

॥ श्री गणराज समर्थ ॥

श्रीमयूरेश गणेंश योगिन्द्राय नमः

## पिताश्री हरिप्रसाद कन्हैय्यालाल तिवारी यांचे स्मरणार्थ

## “भ्रम गेला देव सापडला” हे लिखाण काव्यसंग्रहासह श्रीमातृपितृ, गुरु देवांचे स्मरणपूर्वक श्रीचरणी समर्पण

---

श्रीमातृपितृ, गुरु देवांचे स्मरण ।
आप्तईष्ट, गणगोतांचे, आहे ऋण ॥
देश धर्म सर्व मानव, एक समान ।॥
सुखे चिरायू नांदो, सर्व बंधुसमान ।।१।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. २५२६
२५०२३
काव्य १५यघ्१५
शाखा स्थळ प्रत

---

लेखक, मुद्रक, प्रकाशक रघुनाथ हरिप्रसाद तिवारी दत्तआळी कल्याण.
सर्व हक्क लेखक प्रकाशकाधीन
मुद्रण स्थळ - प्रगती मुद्रण, बदलापूर व कुणाल प्रिंटर्स कल्याण

REFBK-0025023
REFBK-0025023

---

### – सुचना –

१ भ्रम गेला देव सापडला या पुस्तकातूनच नित्यदर्शनायात्रा आणि काव्यसंग्रहात इतर कवितांचे समावेश करुन तीन पुस्तके स्वतंत्र केली आहेत. शुध्दिपत्र व सुचना त्या अनुरोधानेच येथे दिलेल्या आहेत.

२ काव्यसंग्रहात पान ६ अ आणि ६ ब हे पान क्रमांक आठ नंतर आहेत,

३ दर्शनयात्रेची माहिती पान ९ आणि १-२ ब प्रमाणे समजून घ्यावी नंतर यात्रा साधावी ही दर्शनयात्रा भाविकांना घरी करण्यास उत्तमच आहे शुचिर्भुत होऊन नकाशासमोर ठेऊन दर्शन वंदन साधावे.

४ नकाशाचा पान क्रम दिलेला नाही नित्यदर्शन नकाशा पान ११ व मोरेश्वरक्षेत्रांचा नकाशा आहे तो दोन पानावर दाखविला आहे ते पान क्र. १२ आणि १२ अ असे समजावे.

५ भारताचे आठदिशेचे अष्टविनायकांचे चित्र 'भ्रम गेला देव सापडला' या पुस्तकाच्या मुखपृष्ठांवर आहे आणि नित्यदर्शन यात्रेत पान अ आणि ब नंतर आहे तसेच काव्यसंग्रहात पान २९ चे अगोदर चित्रे दिली आहेत.

टीप– शुद्धिपत्र साह्य श्री डॉ. दत्तात्रय य. बोकील व कु. भारती मोरेश्वर जोशी धन्यवाद!

॥ श्री गणराज समर्थ ॥

## — सुचना व शुद्धिपत्र —

(दर्शनयात्रा, काव्यसंग्रह आणि भ्रम गेला देव सापडला या पुस्तकासाठी)

श्री मंगलाचरण श्लोक खाली दिल्याप्रमाणे वाचावे.

**नमस्तस्मै गणेशाय ब्रह्मविद्या प्रदायिने ।**
**यस्यागस्त्यायते नाम विघ्न सागर शोषणे ॥१॥**
**ध्यायेत् स्थिरेण चित्तेन गणेशं सर्वसिद्धिदम् ।**
**बुद्धि प्रकाशकं पूर्णं योगिनां हृदि संस्थितम् ॥२॥**
**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।**
**गुरुःसाक्षाद् परंब्रह्म स्तस्मै श्रीगुरवे नमः ॥३॥**

| पाक्र. | परि. | ओळ | अशुद्ध | शुद्ध | पाक्र | परि | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ले.दोनशद्ब | २ | १ | तेज | तेच | १३ | ५ | २ | स्वारी | वारी |
| ,, | २ | २ | पुत्हा | पुन्हा | २० | १ | २ | केव्हा | केंव्हा |
| ,, | २ | २ | असावे | आहेत | २० | १ | २ | अपसात | आपसात |
| ,, | २ | ४ | माझ्या | माझा | २१ | (शिर्षक) | | आडनांवाचा | आडनांवांची |
| ,, | ३ | २ | कन्याग्रही | कन्यागृही | २२ | १ | १ | अता | आता |
| ,, | ३ | ४ | माझी व, | साठी व | २५ | (तिन्ही स्थानी) | | नूतन | नुतन |
| ,, | ३ | १४ | बजने | बडोन | २६ | १ | ३ | पाशंकीत | शाशंकीत |
| ,, | ३ | १४ | उत्तपात | उत्पात | २६ | ३ | २ | गाणेश | गणेश |
| अ | १ | ३ | ध्यायते | ध्यायेत् | २६ | ३ | २ | गुरुगणेश | गुरुगाणेश |
| अ | १ | ३ | गणेंश | गणेश | २६ | ३ | ३ | वदून | वंदन |
| अ | १ | ४ | ऋदि | हृदि | २६ | २ | २ | दमण | दमन |
| अ | १ | ६ | स्तमै | स्तस्मै | २७ | २ | २३ | दशन | दर्शन |
| अ | १ | ७ | कीरण | किरण | २८ | २ | १ | दमणासाठी | दमनासाठी |
| अ | १ | ८ | जनती | जननी | २८ | २ | १७ | श्रीगणेज्ञाने | गणेशाने |
| ब शेवटी | (यो शके) | | ४८७ | ४०६ | २९ | १ | १ | श्रीमंगलमूर्ति | श्रीमंगलमूर्ति |
| ड | ५ | १७ | मुमुक्षंनका | मुमुक्षू | २९ | १ | १ | काशा | काशी |
| २ | ३ | १३ | मर्तित | मूर्तित | ३० | १ | ७ | जनला | जनीला |
| ४ | ३ | ४ | आम | ओम | ३० | १ | ९ | संदर | सुंदर |
| ६ | १ | ८ | चिन्तमणी | चिंतामणी | ३० | १ | १० | अवंतीकाची | अवंतीकांचा |
| ६अ | २ | २० | गमनागमम | गमनागमन | ३० | १ | १५ | वास्तव | वास्तव्य |
| १३ | ४ | ४ | परवडणारे | परवडणारे रे | | | | | |

पान क्र. अ मधील भजनकाव्यात प्रमोदनाथ शरण हा मूढ मती ऐवजी प्रमोदनाथ आला शरणांगती असे वाचावे.

काही ठिकाणी अनुस्वारी रफार पडले आहेत तसेच सिध्दिबुद्धि ऐवजी सिध्दीबुद्धी असे पडले आहे ते समजून सर्वत्र शुध्द वाचावे.

॥ श्री गणराज समर्थ ॥

# लेखकाचे दोन शब्द

वयाची अट्ठावन्न वर्षे संपली, सेवानिवृत्त झालो. जीवनातील सर्व अनुभव घेत असताना सर्व सामान्य मानव प्राणी " पहले पैसा पिछे भगवान " याच चाकोरीतून जाताना पाहिला. पैसा हे सत्य माध्यम असून आवश्यक आहे हे जरी खरे असले तरी मानवी जीवन नुसत्या पैशाने सुखी होऊ शकत नाही हे पण मी अनुभविले व पाहिले, " पहले पैसा पिछे भगवान " म्हणणारा मानव आपली सर्व संकटे व दुःखे केवळ पैशाने सावरू शकत नाही. संकट समयी शेवटी हा पैशानंतरचा भगवान त्याला आठवतोच. मी तोच विषय निवडला आणि "भ्रम गेला, देव सापडला" हा विषय लिहून पूर्ण केला आहे. या पुस्तकात भ्रमाचे ३५ विषय व कवितातून काहीं विषय लिहिले आहेत. कविता संग्रह स्वतंत्र केला आहे. त्यात धार्मिक, सामाजिक, आध्यात्मिक, मराठी, हिन्दी, इंग्रजी संस्कृत असा भाग आहे, संस्कृत भाग पुराण प्रमाण असाच आहे. बाकी सर्व रचना मी माझ्या अनुभव व ज्ञानाने लिहिले आहे. प्रत्येक ठिकाणी पुराणाधारीत असेच लिखाण झालेले आहे.

विषय देवाचाच असलेने तेच तेज शब्दोच्चाराने देवाचे गुणगाणच घडणारे आहे. म्हणून पुन्हा पुन्हा तेच शब्द लिखाणांत आले असावे. शिवाय दुसऱ्या इतर चुका असणारच. हिन्दी, मराठी, इंग्रजी, गुजराथी म्हणीचाही वापर झाला आहे. ' आम खानेसे काम " या म्हणीप्रमाणे मी एक सामान्य मानव आहे, हे लेखकांच्या काव्यातून मी माझ्या परिचय दिला आहेच

लिखाण लिहून झाले खरे. पण त्याचा उपयोग कसा व्हावा या विचारात असतांना सहज कन्याग्रही गेलो, नातीच्या वाढदिवसाची चौकशी केली. त्या प्रसंगी जावई व कन्या एकदम हसले व म्हणाले, 'तात्या प्रथम तुमचा ६० वा वाढदिवस धूमधडाक्याने करावयाचा आहे मग तुमच्या नातीचा करूंच.' मग मला सर्व खुलासा झाला, माझी व षष्ठब्दी साठी शांत करण्याचा घाट दोघांनी आखून ठेवलेला कळला. मी म्हटले, 'साठी शांत वगैरे धार्मिक भाग थोडक्यात आटपून शेष पैसा चांगल्या कामात खर्चू या. धूमधडाका. हौस, मौज किंवा लाडू-चिवडा या सर्व संपणाऱ्या गोष्टी आहेत, तेव्हा न संपणारा पदार्थ माझ्या षष्ठब्दीचा म्हणजे माझ्या वयाच्या ६० वर्षातील जीवनाचा सर्व ज्ञानानुभवाचा ज्ञानमोदक पुस्तक रूपाने प्रकाशन झाल्यास तीच भेट देऊ या. तो प्रसाद मोदक ज्ञान देणारा व कधी न संपणारा आहे असे मला वाटते, माझी कल्पना दोघांना फारच आवडली व लिखाण छापणे सुरू झाले व अनेक अडचणीमुळे छपाईचे कामात उशीर होत गेला, पुस्तकाचे लिखाण पुराण, वाचन, प्रवचन, कथा-कीर्तनातून मी वेचलेला भाग असल्याने ते सप्रमाण आहे. सामान्याचे हे लिखाण विद्वान किंवा महामान्या समोर जाणारे आहेच त्या सर्व विद्वान पंडितांना विनंती, " क्षमा बड़न को चाहिये छोटन को उत्पात । कहा हरी रहमको जो भृगु मारी लाथ ॥ या हिंदी उक्तीप्रमाणे दोषांचे अभिप्राय देऊन शुद्ध आदेश कळवावे. छपाईचे कामाला आरंभाची मूर्तमेढ श्री. लक्ष्मण शंकर काळे, सिद्धेश्वर आळी, कल्याण यांच्या सहकार्याने आरंभिली. त्यांनी वेळोवेळी खूपच साह्य दिले आहे. शतशः धन्यवाद. प्रगति मुद्रणाचे श्री आठवले यांनी आपले सहकार्य देऊन काम शेवटपर्यंत केले शेष आणि काव्यादी संग्रहाचे मुद्रण कुणाल प्रिंटर्स प्रेस, कल्याण. यांनी उत्तम रीतीने पार पाडले. इतर सहाय्यकमंडळींचे हातभार या कार्यास लाभले आहेच. त्या सर्वांचे आभार मानून सर्वांचे मी श्री चरणी शुभ चिंतन करतो. शेष श्री गणेश शरणम् जय गजानन.

**रघुनाथ हरिप्रसाद तिवारी,** दत्तआळी कल्याण.

॥ श्री गणराज समर्थ ॥

# काव्यसंग्रह-विषयाची सूची


| क्रमांक | विषय | पान नं. |
|---|---|---|
| १ | श्री मंगला चरण श्लोक | अ |
| २ | श्री सद्‌गुरु स्तवन | ब |
| ३ | श्री लेखकाचा परिचय | क |
| ४ | देव शोधला, गुरु सापडला | ड |
| ५ | ओंकार रहस्य | १ ते ६ |
| ६ | बाप्पा बोलतील | ६ अ |
| ७ | कवि कसा असावा ? | ६ ब |
| ८ | मूर्तींत देव आहे. | ७ |
| ९ | गोल शून्य | ८ |
| १० | इच्छा बाई | ९ |
| ११ | ब्रह्म जाणे तो ब्राह्मण | १० |
| १२ | जातीची खंत | ११ |
| १३ | निसर्गाचा शोध | १२ |
| १४ | मंत्र आणि यंत्र | १३ |
| १५ | शांती | १४ |
| १६ | चूप बसा | १५ |
| १७ | वाढत्या लोकसंख्येवर पर्यायी उपाय | १६ |
| १८ | सगळेच अपराधी (जेलमधील बांधवासाठी दिलासा) | १७ |
| १९ | कुष्टी जीवांना दिलासा | १८ |
| २० | हम सब एक है। | १९ |
| २१ | भिंतीला कान असतात | २० |
| २२ | अडनावांचा गाथा | २१ |
| २३ | पुकारा (जेष्ठ नागरिक संघासाठी) | २२ |
| २४ | मानवाचे भवितव्य | २३ |
| २५ | श्रीमती इंदिरा यांना श्रद्धांजली | २४ |
| २६ | नूतन वर्ष सुखाचे जावो | २५ |
| २७ | श्री मोरेश्वर क्षेत्रस्थांसाठी माहिती | २६ |
| २८ | अष्टविनायक स्थानांचा भ्रम | २६ ते २७ |
| २९ | एकशे आठ आणि एकवीस विनायकाची माहिती | २८ |
| ३० | एक आठ आणि एकवीस विनायकाची कटाव | २९ |
| ३१ | छपन्न विनायकांचा कटाव | ३० |
| ३२ | अष्टोत्तरशत श्री गणेश क्षेत्र नामावली | ३१ ते ३२ |
| ३३ | भ्रम गेला देव सापडला (समारोप) | ३३ |
| ३४ | षष्टब्दीचा ज्ञान मोदक ( „ ) | ३४ |


## 'भ्रम गेला देव सापडला' या पुस्तकातील विषय

(१ व २) देव गुरूचा शोध, (३) देव सापडला, (४) श्री मोरेश्वर नित्ययात्रा दर्शन, (५) भ्रम चतुर्थी व्रताचा (चंद्रोदय) जेवण, (६) श्री गजानन गजमुखी मळाचा व शिवपुत्र कथा, (७) उजव्या शूंडेचा गणपती (कडक) भ्रम, (८) भ्रम उंदीर वाहनाचा (९) सारे देव रूप एक, (१०) आत्मा म्हणजे काय ? (११) भ्रम नित्य नैमित्तिक कर्मांचा, (१२) सगळेच मागणारे न मागणारा कोण ?, (१३) श्री गणेश पूजन आधीच का ?, (१४) देव आहे का ?, (१५) काळ व काळाचे कोष्टक, (१६) नियम संयम, (१७) पुनर्जन्म आहे का ?, (१८) मनुष्य बुमुक्षु का मुमुक्षु ? (१९) मंत्र आणि यंत्र, (२०) डोळस श्रद्धा (२१) लक्ष्मीपुत्र व दास, (२२) शाश्वत सुख कोणते ?, (२३) ज्ञान, कर्म आणि उपासना, (२४) योग, भोग आणि रोग, (२५) जुने तेच सोने का बुरसटले?, (२६) प्रयत्नाला दैवाची साथ, (२७) धर्माची खरी ओळख, (२८) देव, मनुष्य आणि राक्षस, (२९) जग हे द्वंद्वातीत, (३०) मीच सांगतो तेच खरे. (३१) प्रथम भक्त का शिष्य ? (३२) ओंकार रहस्य, (३३) गद्य पद्यात्मक, (३३) अष्ट विनायक स्थानाचा भ्रम, एकशे आठ व एकवीस विनायक माहिती व कटाव तसेच छपन्न १०८ विनायकांचा कटाव पद्य वगैरे शेवटी समारोपाची दोन काव्ये एवढे विषय आहेत.



श्री स्वानंदाधीशो मयूरेशो विजयते

# मंगला चरण (श्लोक)

नमस्तस्मै गणेशाय ब्रह्म विद्या प्रदायिने ।
यस्या गस्त्यायते नाम विघ्नसागर शोषणे ।।१।।
ध्यायेते स्थिरेण चित्तेन गणेंशं सर्वं सिद्धीदम् ।
बुद्धी प्रकाशकं पूर्णं योगिना ऋदि संस्थितम् ।।२।।
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर: ।।
गुरू साक्षाद परंब्रह्म स्तमै श्री गुरवे नम: ।।३।।
नमू श्री शारदा माता तू काव्य कीरण संबोधिनी ।
नमू श्री वाग् विद्यातू स्वर शब्दांची जनती ।।
नमू श्री सरस्वती, तू गद्यपद्यांची असे लेखणी ।
नमू हे श्री काव्यस्फूर्ती तात्या तिवारी करी विनवणी ।।१।।

## भजनकाव्य (रचना लेखक)

जय गणेश देवा, श्रीं बुद्धीपती । सिद्धी विनायक तू प्रणव मुखी ।। धृपद ।।
अकारी विराजले श्री लक्ष्मीपती । रामकृष्ण विष्णू जयपृथ्वींपती ।।
उकारी विराजले श्री उमापती । जय श्री शंकर कैलास पती ।।१।।
मकारी विराजले श्री संज्ञा पती । जयभानू भास्कर तुझीच मूर्ति ।।
वेलांटी अनुस्वारी श्री आदि शक्ती । जय देवी भवानी तुझीच किर्ती ।।२।।
ईश महेश विष्णू हे रवि शक्ति । बिन्दू स्थानी शोभे पिता गणपती ।।
ओंकारी बसल्या ह्या पंच मूर्ति । जय सिद्धि पती जय बुद्धी पती ।।३।।
ओम नमो अद्या तुलाच म्हणतीं । आत्मा चिन्तमणी तूच गणपती ।।
प्रमोदनाथ शरण हा मूढ मती, । दे आशिर्वाद हे श्री मंगल मूर्ति ।।४।।
जय गणेश देवा श्रीं बुद्धीपतीं । सिद्धींविनायक तू प्रणव मूखी ।।

॥ श्री गणराज समय ॥

श्री मयूरेशाय गणेश योगीन्द्राय नमः श्री अंकुशधारी गुरु हेरम्बायनमः







श्री अकुंशधारी योगीन्द्र | श्री गणेश योगीन्द्र | श्री हेरम्बराज योगीन्द्र

# श्री सद्गुरु स्तवन

धन्य समाधी योगीन्द्रांची ।
मोरगांवी कऱ्हेकाठीची ॥
गणेश अकुश धारींची ॥।
श्री सद्गुरू हेरम्बाची-
धन्य समाधी योगीन्द्रांची ॥१॥

ऐकुनी किर्ति योगीन्द्रांची ।
सत्वर होई शांती मनाची ॥
मी दासी त्या गुरुचरणाची ॥।
आवड मजला गुरुपुजेची -
धन्य समाधी योगीन्द्रांची ॥२॥

हेरम्बा तुम्ही माझे आई ।
दर्शन द्याहो मज लवलाही ॥
आस पुरवा मन्मनीची ॥।
ठाव द्याहो तुमच्या पायी -
धन्य समाधी योगीन्द्रांची ॥३॥

चित्ती ध्यास तुझाच नाथा ।
आश्रय देई या अनाथा ॥
ठेविते चरणी तुमच्या माथा ॥।
वाट पाहते जोडूनी हाता -
धन्य समाधी योगीन्द्रांची ॥४॥

समाधी दर्शनी भक्त जो गेला ।
स्व सुखाने तो आनंदला ॥
ललिता सांगे या भजनाला ॥।
मोरगांवी जाऊ दर्शनाला -
धन्य समाधी योगीन्द्रांची ॥५॥

(आषाढी पौर्णिमा शके १९०५ योगींद्र शके ४८७)
(दिनांक २४-७-८३ रविवार)
रचना लेखकपत्नी सौ. ललिता रघुनाथ तिवारी

॥ श्री गणराज समर्थ ॥

॥ श्री भूस्वानंदाधीशो मयूरेशो विजयते ॥



निजे भूस्वानंदे जडभरत–भूम्यां परतरे ॥
तुरीयायास्तीरे परमसुखदे त्वं निवससि ॥
मयूराया नाथस्त्वमसि च मयूरेश भगवन् ॥
अतस्त्वां संध्याये शिव-हरि रवि-ब्रह्म-जनकम् ॥१॥

श्रीक्षेत्र मोरेश्वर (मोरगांव जि. पुणे)

॥ श्री गणराज समर्थ ॥



॥ श्री वेदांत रत्नमूर्ती ॥

स्वानंदवासी हरिप्रसाद कन्हैय्यालाल तिवारी

• पुण्यतिथी फा.शु.६ शी शके १८५० मालेगांव नाशिक.

पिता श्री हरिप्रसाद वेदमूर्ति ।
माता केशरसुंदर दोन स्फूर्ति ॥
पितृ सर्व गेले हे स्वानंदतिर्थी ॥।
जिल्हा नाशिक मालेगांवची किर्ती ॥१॥

शोभले खरे आडनांव तिवारी
त्रिवेदी तीन वेदांचे अधिकारी
त्रिपाठी तीन पाठांचे मानकरी
त्रिवेदी त्रिपाठी तेच हे तिवारी

॥ श्री गणराज समर्थ ॥



श्रावण कृष्ण षष्टी बुधवार शके ९१०४ श्री योगीन्द्र शके ४०६ दि. ११-८-८२
( लेखक- पती, पत्नी, आपल्या अधिष्ठानी षष्टद्वी संकल्प पुर्ति समयी प्रार्थना व समर्पण साधत असतांना )

॥ श्री गणराज समर्थ ॥



( लेखक- षष्टद्बी पूर्ति समारंभाच्या प्रसंगी "भ्रम गेला देव सापडला" हे लिखाण श्रीं चरणी समर्पण करीत आहे. )
श्रावण कृष्ण षष्टी बुधवार शके १९०४ यो. शके ४०६ दि. ११-८-८२

# लेखकाचा पद्यातून परिचय

श्री मयूरेश मुद्गल देव गुरु ।
श्री हेरम्ब गुरु माझे सद्गुरु ।।
श्री अंकुशधारी ते गुरुंचे गुरु ।।।
श्री गणेश योगींन्द्र गाणेश गुरु ।।१।।

प्रथम वंदन करुया श्री गणनाथ ।
मातृ पितृ देवकृपेची लाभली साथ ।।
आप्त इष्ट मित्रांनी दिला प्रसंगी हात ।।।
कर्ता करविता तोच गुरु गणनाथ ।।२।।

मातृ पितृत्रय (दोन्हीकडचे)

श्री हरि कन्हैय्या खुषाल हे तिवारी ।
केशर सुंदर कमा चंपा ह्या मातोश्री ।।
कन्हैय्या देवीं गणेश हे शुक्ल मातुली ।।।
चिमा पद्मा कन्हा धन्य माता माऊली ।।३।।

जन्मघरी नांव असे रघुनाथ ।
शिष्य गुरु घरी मी प्रमोदनाथ ।।
तात्या तिवारी मिळते अशी साथ ।।।
जय गजानन तिवारी म्हणतात ।।४।।

संस्कृत हिंदी इंग्रजी मी शिकलो नाही ।
मी साहित्यिक ज्ञानी पंडित कवि नाही ।।
महाराष्ट्री जन्मलो हिंदी मराठी आई ।।।
सर्व भाषा जननी वंदितो श्रृती आई ।।५।।

कृपादान केले श्री मंगल मुर्ती ।
मातृ पितृ दर्शनी लेखन स्फुर्ती ।।
सौभाग्यवतीचीही प्रेरणा शक्ती ।।
तात्या तिवारी हे लेखन करती ।।६।।

देव पितृ मानव ऋण साधले ।
शेष ऋण राहिले आयु संपले ।।
देव शोधला भ्रमी लिहुन झाले ।।।
शेष जीवन हे काव्यात रमले ।।७।।

मी नसे साहित्यिक कवि लेखक ।
लिहिलें प्रकाशले छोटे पुस्तक ।।
व्यवहारी ऋण आहे निश्चित ।।।
अल्पज्ञान बोधे मी ऋण फेडीत ।।८।।

कन्याशमिकाही प्रतिभा नावाची ।
केली व्याही भेट मी चंद्रात्रे यांची ।।
लाभल्या अपर्णा मेघना या नाती ।।।
विजय जावई पुस्तक प्रकाशती ।।९।।

ज्ञात अज्ञात ज्यांनी केला उपकार ।
सर्वांचे नाव घेणे कसे जमणार ।।
क्षमा अंगी मोठे पण ते साधणार ।।।
श्रीचरणी मी त्यांचे शुभचिंतणार ।।१०।।

।। श्री गणराज समर्थ ।।

## ( पंचविशीतले लेखक पति-पत्नी )

 

श्री. सां. प्रमोदनाथ    श्री. सां. सौ. लता तिवारी

# " देव शोधला गुरु सापडला "

सन एकोणीसशे अठ्ठेचाळीस, हा जिवनात आला ।
शके शालीवाहन अठराशे सत्तरी, योगजमला ।।
गणेश योगींद्र शके तीनशे बहात्तरी मोरगांवला ।।।
देव गुरूचा हा शोध, लेखकपतिपत्नीला लागला ।।१।।

श्री मयूरेश्वर मंगलमूर्ति देव येथे सापडला ।
श्रीयोगीन्द्र मठी श्रीहेरम्बगुरु हा श्री योगीन्द्र भेटला ।।
देव शोधला गुरू सापडला प्रवास येथे थांबला ।।।
लेखक पतिपत्नीने येथे उपासनेला आरंभ केला ।।२।।

ज्ञानानुभव मनी आरंभिचा असे सर्व साठविलेला ।
उपास्य गणेशपिठी उभयताने देह रमविला ।।
नव विधा भक्तिचा हा कर्मयोगी येथे अनुभविला ।।।
ह्या देव गुरु ज्ञानाने, दूध साखरेचा योग साधला ।।३।।

लेखक पतिपत्नी ललींता-रघुनाथ ह्या नांवाने आला ।
गुरु श्री हेरम्ब योगीन्द्रे लता-प्रमोदनाथ संबोधिला ।।
कन्या शमिका शमी कृपेची प्रपंचीं आनंद दाटला ।।।
ज्ञानाने न्हालो येथे, घालविले भ्रमाला, देव सापडला ।।४।।

लाभ व्हावा मुमुक्षूंनका, भाविकांना तळमळही मनाला ।
विचार मनी आला सांगावा का हा अनुभव जगाला ।।
मी नसे विद्वान अनुभवाचा हा घास आहे भुकेला ।।।
श्रीगणेश लेखक गुरु गणेश मी निमित्य पुस्तकाला ।।५।।

भ्रम गेला देव सापडला.

# "श्रीदेव आणि गुरु मंडल"

श्रीसिद्धिबुद्धिपती मयूरेश



श्रीओंकारप्रधानरुप गणेश




श्रीमयूरेशाय गणेश योगीन्द्राय नमः श्रीअंकुशधारी गुरु हेरम्बाय नमः



श्रीअंकुशधारी योगीन्द्र



श्रीगणेश योगीन्द्र



श्रीहेरम्बराज योगीन्द्र

॥ श्री गणराज समर्थ ॥

श्री मयूरेश गणेश योगीन्द्राय नमः

# - लेखक परिवार -

पंचवीशीतील लेखक पती पत्नी (तिवारी)





खक- श्री.प्रमोदनाथ तिवारी. लेखकपत्नी-सौ. लता तिवारी

नात, कन्या जावई (चंद्रात्रे)



नात- कु. अपर्णा विजय चंद्रात्रे
कन्या- सौ. शमीका (प्रतिभा) उर्फ
सौ. सुवर्णा विजय चद्रात्रे
जावई- श्री. विजय सावळाराम चंद्रात्रे

अठ्ठावन्नवर्षीय सेवानिवृत्त लेखक पत्नीसह



श्री. रघुनाथ हरिप्रसाद तिवारी



सौ. ललिना रघुनाथ तिवारी

॥ श्री गणराज समर्थ ॥




सारे देव रुप एक ओंकार प्रधान समष्टीरुप दर्शन



श्रीगणेश भजनी महिला मंडळ कल्याण दि. १४-३-८२ ला सादर केलेला प्रयोग

कलाकार- श्रीगणेश-कु. गणेश विनायक फाटक श्रीविष्णू-कु. राजीव रामचंद्र काळे
श्रीशंकर- कु. राजेंद्र श्रीपाद कांबळे श्रीसूर्य-कु. जितेंद्र श्रीपाद कांबळे
शक्तिदेवी- श्रीकुमारी राजेश्री श्रीपाद कांबळे

निवेदन -र. ह. तिवारी सादरकर्त्या- सौ. ललिता रघुनाथ तिवारी



चित्र क्र.१ व २-सारे देवरुप एक प्रसंगाचे दर्शन, चित्र क्र.३-श्री गणेश भजनी महिला मंडळ कल्याण १) सौ. ललिता तिवारी २) सौ. कुसुमताई घाटे ३) सौ. प्रभाताई दहिवलकर ४) सौ. भारती कांबळे ५) सौ. मालतीबाई फाटक ६) सौ. लक्ष्मीबाई अभ्यंकर ७) सौ. सुशिलाबाई विश्वाद ८) सौ. प्रभावती विश्वाद ९) सौ. मथूराबाई दांडेकर १०) सौ. लिलाबाई सोपारकर ११) सौ. लक्ष्मीबाई मोडक १२) श्रीमती लिलाताई कोटकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

।। श्री गणराज समर्थ ।।

# " ओंकार रहस्य "

मंगल मूर्ति मोरया पुढच्या वर्षी लवकर या, या जयघोषाने नविन भ्रमाची निराळीच भर पडली. "भ्रम गेला देव सापडला" हे लिखाण चालू असतांना शंका आली की हा मंगल मूर्ति येतो कुठून व पुढच्या वर्षी लवकर या हा निरोप घेऊन तो जातो कुठे आणि तो नक्की राहातो कुठे हा भ्रम नसला तरी भ्रमांत टाकणारा हा विषय नक्कीच आहे. मला सापडलेल्या देवांशी संबंधीत हा विषय असल्याने मी माझ्या अनुभव ज्ञानाने म्हणजे पुराण श्रवण, व वाचनातून मला समजलेले तेच येथे निवेदनातून थोडक्यांत सांगुन काव्यातून त्याचे विश्लेशण करीत आहे काव्य संस्कृत, हिन्दी, मराठी व इंग्रजीत केले आहे. संस्कृत हे प्रमाण श्लोक म्हणून घेतले आहे. श्रीमुदगलपुराण, श्रीगणेशपुराण, श्रीब्राह्मपुराण श्रीब्रह्मांडपुराण तसेच श्रीस्कंदपुराण, श्रीमारीचपुराण. श्रीगणेशभागवत, श्री चिंतामणी विजय, श्रीगणेश तापीनी, इत्यादी सर्वच पुराणांतून ओंकाराचे रहस्य समजू शकते. मी थोडक्यात पुराणाधारे हिन्दी, मराठी व इंग्रजी काव्यरचना करुन हे ओंकाराचे रहस्य येथे देत आहे.

माझ्या पुस्तकातील सापडलेल्या देवाशी संबंध म्हणजे श्रीक्षेत्र मोरगांव जिल्हा पुणे होय श्रीमंगलमूर्ति मोरया ही मूर्ति श्री ब्रह्मा, विष्णू आणि महेश आदिशक्ति सूर्यादी या पांच ईश्वरांनी सृष्टी निर्माण करण्यापूर्वीच ही मूर्ती भाद्रपद शुद्ध चतुर्थीला प्रथम स्थापीली ती स्वाती नक्षत्र सोमवार माध्यानकाल समयाच्या मुहूर्तावर या मोरेश्वर क्षेत्री स्थापून श्रीगणेशाला प्रसन्न करुन घेतले व श्रीगणेशाने येथेच सर्व देवांना कार्य सिद्धि दिली आहे असे पुराणांतील वर्णन आहे. नंतर श्रीब्रह्मदेवाने माती, वाळू,

रत्नादी मिश्रीत अशी पार्थीव मूर्ति तयार करुन ती येथे भाद्रपद शुद्ध चतुर्थीला स्थापीली श्री क्षेत्र मोरगांव येथे त्या मुर्तिचे दर्शन आजही घडत आहे म्हणजे भाद्रपद शुद्ध चतुर्थीला पार्थीव मंगल मूर्तिचा हा आरंभ श्रीक्षेत्र मोरगांवी प्रथम पंचेश्वरांनी केला व तीच प्रथा आजपर्यंत चालू आहे. घरोघरी भाद्रपद शुद्ध चतुर्थीला पार्थीव मूर्ति आणली जाते व ती पुढच्या वर्षी लवकर या म्हणून विसर्जन केली जाते ही परंपरा आजपर्यंत चालूच आहे.

भाद्रपद शुद्ध गणेश चतुर्थीचा उत्सव सार्वजनीक स्वरुपातून सर्वत्र होत असतो. हजारो लाखो रुपयें खर्च होतात रात्रंरात्र जागून भाविक उत्सवाची आरास-सजावट करीत असतात भाद्रपद शुद्ध चतुर्थी ते चतुदर्शीपर्यंत मंगल मुर्तिचा जयघोष चालू असतो अगदी वेदादी मंत्रापासून डिस्को नाचगाणापर्यंत सर्वच उपचारांचे प्रदर्शन पहावयास व ऐकावयास मिळते शेवटी चतुदर्शीला ढोल लेझिम डिस्को डान्सच्या जल्लोशाने बाप्पा निरोप घेतात. म्हणजे पुढच्या वर्षी लवकर या हा निरोप घेऊन बाप्पा जातात

हा बाप्पा कुठून येतो कुठे जातो व कुठे रहातो हाच आपला मुख्य विषय आहे. माझ्या अनुभवाने हा बाप्पा कुठून येत नाही व कुठेही जात नाही आपणच फक्त जात येत असतो आपणास नेणारा तो आत्मा मात्र कारण आसतो तोच हा "ओम नमोजी आद्या वेद प्रतिपाद्या जयजय स्वसंमवेद्या आत्मरुपा देवा तूची गणेशु आहे" आपल्या सर्वांचा प्राणात्मा तोच हा आत्मा व परमात्मा आहे असा हा ओमच्या आकाराप्रमाणे ओंकार मुखी श्रीगणेश तोच गजमूखी श्रीगजानन आहे त्यालाच प्रणवमुखी म्हटले आहे असा हा सर्व देवांचा जनक म्हणजे "ओंकार प्रधानरुप गणेशाचे ते तिन्ही देवांचे जन्म स्थान" आहें हे संतानी सांगितले आहे. वेद पुराणांनी त्याला श्रीलंबोदर श्रीचिंतामणी, श्रीबुद्धिपति, श्रीसिद्धिपति म्हटले आहें. तोच श्रीलक्षलाभ पिता पण आहे तसाच तोच पंचेशजनक आहें असा हा श्रीमंगलमूर्ति सर्वांनींच मानला व गायीला आहे सर्व भाविकभक्तांचे आपापले देव मंगल करणारे आहेतच त्या सर्व मंगल करणाऱ्या देव मूर्तिचे हें माहेर म्हणजे जन्मस्थान या ओंकारातच समष्टीरुपाने असल्याने सर्व मंगलकारी देव याच मूर्तित एकत्र येतात व नित्य तेथेच राहतात उदा. जसा रुपयातील १ पैसा कमी झाला तर रुपया पूर्ण होत नाही त्या प्रमाणेच आमच्या सर्व देवा पैकी एक देव कमी असला तर मंगल मुर्ति हा शब्द पूर्ण होत नाही म्हणूनच या ओंकार प्रधान रुपाला श्री मंगल मूर्ति म्हटले आहे.

हा ओंकार गणेश म्हणजे सर्वाचा आत्मा व सर्वांच्या बुद्धित असणारा बुद्धिपती आहे तसाच तो सर्वांना सिद्धि देणारा सिद्धिविनायक आहे.तोच सर्वांची आशा पूर्ण करणारा आशापूरक आहे अशी ही भाद्रपदाची मंगल मूर्ति आपण

आणतो व तीची आरती करतो "सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची, म्हणजे तो विघ्नराज व विघ्नहर आहे. "दास रामाचा वाट पाहे सदनी संकष्टी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवर वंदना" या आरतिच्या शेवटच्या कडव्यात सूरांना म्हणजे सर्व देवांना वर देणारा असा हाच श्री वरद विनायक आहे श्रीसमर्थांनी ही आरती रचली म्हणून दासरामाचा वाट पाहे सदना असे म्हटले आहे ही आरती श्रीसमर्थ रामदासांनी श्रीराम प्रभुंचे आज्ञेनेच या मोरगांवच्या मंगल मूर्तिच्या समोर म्हटली आहे तीच आपण आजही म्हणत असतो. श्रीसमर्थांनी मनाचे श्लोकांत प्रथम म्हटले आहे. "गणाधीश जो ईश सर्वांगुणांचा मुळारंभआरंभ तो निर्गूणांचा असा हा ओम म्हणजे ओंकार हे निर्गुणाचे प्रथम सगुण दर्शन आहे या ओमचे पांच भाग म्हणजे १ अकार (श्रीविष्णू)२ उकार (श्री शंकर)३ मकार (श्रीसूर्य)४ नाद (श्रीशक्ति)आणि ५ बिन्दू रुपांत गणेश असे हे वर्णन मी काव्यातून केले आहे. हा बाप्पा म्हणजे नक्की आपल्या देहातील तोच ओमनमोजी आत्मरुपा म्हणजे आपला आत्मा म्हणून असतो व त्या ओमचे आंत आपले सर्व देव असतात त्यांची ओळख पटावी म्हणून मी शेवटच्या हिंदी पदांत मेरे सरपे मेरे दिल मे मेरे शरीरमे मेरे किस्मतमे व मेरे आत्मामे तो बाप्पा सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे तो आपल्या देहातील आत्मरुपांत राहाणारा तोच हा श्री मंगल मुर्ति होय काव्यातील वर्णनावरुन ओंकाराचे रहस्य समजू शकते श्री मंगल मुर्ती कुठून येतात कुठे जातात व नक्की कुठे रहातात हा खुलासाही ह्या काव्यातून समजणारा आहे. हा बाप्पा कुठे जात नाही तोच आपल्याला जिवंत ठेवणारा आपला आत्मा आहे तोच आत्मरुपा देवा तुची गणेशु असे संतवाणीने व पुराणाने गायीले आहे आपल्या देहांतच राहाणाऱ्या या ओंकार रुपी आत्म्याचे हे रहस्य व तो ओंकार मी मेरे अंगनमे ऐवजी मेरे दिमागोमे या धृपदाने सांगून त्या ओंकारातील सर्व देव मेरे दिलमे, मेरे सरपे, मेरे किस्मतमे, मेरे शरीरमे व मेरे आत्मामे कुठे आहेत हे सांगितले आहे.

संस्कृत श्लोक पुराण प्रमाण म्हणून घेतले आहेत हिन्दी, मराठी व इंग्रजी रचना मीच केली आहे हिन्दीत देवा हो देवा गणपती देवा व मेरे अंगनेमे ही चाल घेतली म्हणून शंका घेण्याचे कारण नाही चालीने काव्याचा दर्जा कधीच कमी होत नाही उलट काव्याच्या बोध वाक्याकडे चालीने आकर्षण वाढणारे आहे. अंगणांतले नाटक आपल्याच शरिरांतील देवांना आवडेल का ? याची जाणीव नक्कीच या चालीने होणारी आहे. मी माझ्या अनुभवाने हे काव्य रचले आहे. ते केवळ ओंकाराचे रहस्य समजावे म्हणून ओंकार हाच आपला आत्मा तोच सगुण रुपाने ब्रह्मा,विष्णू,महेश, देवी व सूर्य तोच सर्व कांही आहे त्यामुळेच आम्हाला धर्म,अर्थ, काम व मोक्ष देणारे सगुण सर्व देव त्या आत्मारामामुळेच कृपा करणारे आहेत हे सर्व भाविकांना समजावे म्हणून हा अल्पसा प्रयत्न आहे.

॥ श्री गणराज समर्थ ॥

## संस्कृत (प्रमाण पुराणाधारीत श्लोक)

**श्री गणेश पुराण**

नमस्तस्मै गणेशाय ब्रह्म विद्या प्रदायिने ॥
यस्या गस्त्यायते नाम विघ्नसागर शोषणे ॥ १ ॥

**समष्टी रुप ओंकार**

अकारो वासुदेवस्यात् उकारस्तु महेश्वरः
मकारःसूर्य इत्युक्तः शक्तिर्नादात्मिका मता ॥
बिंदु रूपो गणेशःस्यात् ओंकारः पंच देवता ॥ २ ॥

**श्री ब्रह्मांड पुराण**

ओंकार निलयं देवं गजवक्त्रं चतुर्भुजम ॥
पिचंडिलमहं वंदे सर्वविघ्नोपशांतये ॥ १ ॥

**श्री ब्रह्मपुराण**

यस्मादिद समुद् भूतं यदा धारेण तिष्ठति ॥
अंते यस्मिन लयं याति गुहास्थं तं नमाम्यहं ॥ २ ॥

**श्री मूद्गलादीपुराण**

ध्यायेत् स्थिरेण चित्तेन गणेशं सर्वसिद्धिदम् ॥
बुद्धि प्रकाशकं पूर्णं योगिनां हृदिसंस्थितम ॥ १ ॥
गायत्री वेद मातेयं पिता प्रणव उच्चते ॥
स एव गणनाथोऽयमोंकाराकृति मस्तकः ॥ २ ॥

गकाररूपेण भवान् सगौणो, णकार रूपेण च निर्गुणोऽसि
तयोरभेदे गणनाथनामा योगेश भक्तेश नमोनमस्ते ॥३॥

## इंग्रजीतून ओमचे रहस्य

ओ–यू–एम मीनस् ओम्, ओम् मीनस् ओंमकार
ओ मीनस् अकार, गॉड ऑफ् विष्णू ॥
यू मीनस् उकार, गॉड ऑफ शिवा ॥
एम् मीनस् मकार, गॉड ऑफ सूर्या ॥
हाफ् राऊंण्ड नाद, गॉड ऑफ शक्ति ।
मेन पॉइंट बिन्दू, गॉड ऑफ गणेश ॥
ऑल गॉड इन ओम इज् गणेश हेड ॥ १ ॥

गुड अँण्ड बॅड वर्क, बोथ फार्म युवर लक
गुड मायनस बॅड, इज् युवर रियल लक
गॉड ऑफ सक्सेस, गॉड ऑफ विजडम
ऑल माईटी गॉड, गणेश ओ–यू–एम=आम

## " पद्य हिन्दीमे ,,

देवा हो देवा बुध्दिपती देवा, तुमसे छूपा है कौन - स्वामी तुमसे छूपा है कौन
ईश महेश सब देव गणोमे, तुमसे बढकर कौन ॥ धृवपद ॥

लक्ष पिता तुम सिध्दि विनायक , बुध्दि दिलावे कौन स्वामी बुध्दि दिलावे कौन
लाभ पिता तुम सिध्दि विनायक, बुध्दि भूलैया कौन ॥ १ ॥

अष्ट रिपूके अष्ट विनायक, रिपू हटावे कौन स्वामी रिपू हटावे कौन
पाप संकट के शमि विनायक विघ्न हराये कौन ॥ २ ॥

लक्ष्मीनारायण के तुम विनायक, धर्म सवारे कौन स्वामी धर्म सबारें कौन
उमा महेशके तुम गजानन, अर्थ समाले कौन ॥ ६ ॥

रती मदनके शक्ति विनायक, शक्ति बढाये कौन स्वामी शक्ति बढावे कौन
संज्ञासूर्यके तुम विनायक, मुक्ति दिलावे कौन ॥ ४ ॥

ब्रह्म कमंडलू गंगा जननी, स्नान कराये कौन स्वामी स्नान कराये कौन
तिर्थात्मा श्रीतिर्थराज तुम, तुमसे बढकर कौन ॥ ५ ॥

श्री गणेश योगिंद्र हेरम्ब गुरो, शिष्य तिवारी कौन स्वामी शिष्य तिवारी कौन
सब ज्ञान पिठोके गाणेश गुरो तुमसे बढकर कौन ॥ ६ ॥

देवा हो देवा बुध्दि पती देवा, तुमसे छूपा है कौन स्वामी तुमसे छूपा है कौन
ईश महेश सब देव गणोमे, तुमसे बढकर कौन

## मराठीत (ओंकार रहस्य)

जय गणेश देवा, श्री बुद्धिपती । सिद्धि विनायक तू प्रणव मुखी ।। धृपद ।।
अकारी विराजले श्रीलक्ष्मीपती । रामकृष्ण विष्णू जयपृथ्वीपती ।।
उकारी विराजले श्री उमापती । जय श्री शंकर कैलास पती ।। १ ।।

मकारी विराजले श्री संज्ञा पती । जय भानू भास्कर तुझीच मूर्ति ।।
वेलांटी अनुस्वारी श्री आदी शक्ति । जय देवी भवानी तुझीच किर्ती ।। २ ।।

ईश महेश विष्णू हे रवि शक्ति । बिन्दू स्थानी शोभे पिता गणपती ।।
ओंकारी वसल्या ह्या पंच मूर्ति । जय सिद्धि पती जय बुद्धि पती ।। ३ ।।

ओम नमो अद्या तुलाच म्हणती । आत्मा चिन्तमणी तूच गणपती ।।
प्रमोदनाथ शरण हा मूढ मती । दे आशीर्वाद हे श्री मंगल मूर्ति ।। ४ ।।

## हिन्दीतून (ओंकार रहस्य)

मेरे दिमागोमे, बुद्धिका नाम है । जो है बुद्धि वाला वो है सिध्दिवाला
गणेश उसका नाम है ।। धृपद ।।
मेरे दिलमे देखो, तुलसीकी याद है । जो है तुलसीवाला वो है बन्सीवाला ।
शाळीग्राम विष्णूका नाम है ।। १ ।।
मेरे सरपे देखो, जटाओंका भार है । जो है जटाधारी वो है गंगाधारी ।
महेश उसका नाम है ।। २ ।।
मेरे शरीरको देखो, ताकदकी कमी है । जो है ताकद वाली वो है माताकाली ।
माता देवीका नाम है ।। ३ ।।
मेरे किस्मतको देखो, धूपछावने घेरा है । जो है धूपवाला उसीका ये उजाला ।।
सूरज उसीका नाम है
विष्णू महेश को देखो, भानूशक्तिभी साथ है । जो है विष्णूमहेश वो है शक्ति सूरज ।
ओंकार उसका नाम है ।। ५ ।।
मेरे आत्माको देखो, सब आत्माका स्थान है । जो है सबका आत्मा वो है एक परमात्मा ।।
आत्माराम उसीका नाम है ।। ६ ।।
गाणेश गुरु को देखो, गुरु हेरम्ब का नाम है । तिवारी लिखनेवाला माता केशरने पाला ।
पिता श्री हरिका नाम है ।। ७ ।।
मेरे दिमागोमे बुद्धिका नाम है । जो है बुध्दिवाला वो है सिध्दिवाला ।
गणेश उसका नाम है ।। ८ ।।

# " मूर्तीत देव आहे "

देऊळी देव नाही मूर्तिहो देव नाही ।
मुर्तित प्राण आहे, प्राणात देव आहे ।।
दैवात देव आहे दैवी नशिब आहे ।।।
क्रियेत कर्म आहे, कर्मांत देव आहे ।। १ ।।

देहांत धर्म आहे, धर्मात अधर्म आहे ।
देहात अर्थ आहे, अर्थात अनर्थ आहे ।।
देहात काम आहे, काम निष्काम आहे ।।।
देहात मुक्ति आहे, मुक्तित मोक्ष आहे ।। २ ।।

मूर्तित प्राण आहे, देहात प्राण आहे ।
देह देऊळ आहे, जिव कवच आहे ।।
प्रतिष्ठी देव आहे, मूर्ति कवच आहे ।।।
देऊळी देव आहे, मूर्तित देव आहे ।। ३ ।।

देहांत मीच आहे, आत्म्यांत कोण आहे ।
देहांत जिव आहे, जिवांत कोण आहे ।।
जिवांत प्राण आहे, प्राणांत कोण आहे ।।।
प्राणांत तोच आहे, आत्म्यांत राम आहे ।। ४ ।।

बाल तारूण्य आहे, तारुण्य मौज आहे ।
मौजेत भोग आहे, भोगात रोग आहे ।।
वृद्धत्व येत आहे, मृत्यु बोलत आहे ।।।
जिवांत जिव आहे, मृत्यु अटळ आहे ।। ५ ।।

जन्मांत मृत्यू आहे मृत्युत कोण आहे ।
मृत्युत जन्म आहे, देहांत कोण आहे ।।
मी मी तू म्हणत आहे, जिवांत तूच आहे ।।।
आत्मा अमर आहे, तात्या सांगत आहे. ।। ६ ।।

॥ श्री गणराज समर्थ ॥

# " गोल शून्य "

गोलांत शून्य होतें, शून्यांत गोल होते ।
हे जगही गोल होते, आकाश गोल होतें ॥
गोलांत गोल होते, चंद्रसूर्यादी गोल होते ॥।
ब्रह्मांड गोल होते, त्या गोलांत कोण होते ॥ १ ॥

शून्य म्हणे गोलाला, जाऊ चल खेळायला ।
शून्यांत शून्य व्याला, प्राण जिवांचा झाला ॥
जिवात्मा झाला गोल, हें शरीर त्याची ढाल ॥।
खेळूनी शून्य थकले, ढाल टाकूनी पळाले ॥ २ ॥

शून्यात प्राण होते, प्राणांत कोण होते ।
देहांत प्राण होते, आत्म्यांत कोण होते ॥
सोहं स्वतःच म्हणतो, गर्भात तोच असतो ॥।
कोहं म्हणूनी रडतो, देह सोडूनी जातो ॥ ३ ॥

गोलांत शून्य होते, गोल झोपलेच नाही ।
ब्रह्मांत जो शून्य पाही, तो कधी झोपलाच नाही ॥
गोल गोलात झोपले, पुन्हा उठलेच नाही ॥।
झोपून जागुन थकले, त्या गोलांत शून्य नाही ॥ ४ ॥

शून्यांत तेच गोल होते. गोलांत तेच शून्य होते ।
कुणी हा खेळ सुरु केला, खेळ खेळतांच संपला ॥
विचारी गोल त्याच शून्याला, कशाला हा तू खेळ मांडला ॥।
तात्या म्हणे त्या गोल जगाला, जा विचार तू त्या ब्रह्मांडाला ॥ ५ ॥

---

टीप :– निर्गुणांतून शून्य निर्माण होते शून्यांतून गोल ब्रह्यांड निर्माण होते त्यातून असंख्य शून्य व गोल जन्म घेतात व शेवटी सर्व शून्यांतच विलीन होतात.

# "बाप्पा बोलतील सावधान"

भाद्रपदीच्या गणेशोत्सवात या गजमुख ओंकार गणेशाचे सर्व रुप बदलून त्याला कलेने पछाडले आहे पण ती कला कलेच्या दात्याभोवती का ? प्रसन्नवदन हे विणा, झारा सापाचे का ? तसेच देवांचे सर्व अवयव भांडी, वाजंत्री पशू पक्ष्यांचे कां ? तेव्हा बाप्पा बोलतील सावधान हे काव्य बाप्पानेच घडवून घेतले. (काही मूर्तिच्या दर्शनाधारे)

गणराज बोलले तर घडेल खरा आकांत । शिल्पकार कलाकार मग शोधतील एकांत ।।
विचार करारे भक्तांनो बाप्पा काय बोलतील । आपण भ्यायचे कशाला-अध्यक्ष सर्व ऐकतील ।।१।।

बाप्पा बोले हे भक्ता मला कुठे कुठे फिरविले । देव देश भक्तांत काय भाजीतही बैसविले ।।
आता पाळी वाजंत्रीची किमया चित्र कलेची । नाल मृदुंगी मांडचा शोभती तबला डग्गाही हाती ।।२

सोंड करुन तोंडी वीणा दिले स्वरांचे आसन । झांजा दोन्ही स्तनी बसल्या डफल्या धरती कान ।।
बाप्पाचे हे विडंबन नसे ताशा सांगे ओरडून । भक्तांची झाली गर्दी कलाकार गेले भारावून ।।३

लोटी भांडे कालथा पातेली झारा हा कढईत । नाग कासव पशु पक्षी करतील पंचाईत ।।
नित्य लहान किडक्या सुपारीत माझे पूजन । आज लाभले चांगल्या सुपारीत मोठे आसन ।।४

किलवर म्हणतो पाहू ऐकूनका चूप बसा । हे माझे विडंबन आहे का ? कौतुकाचा आरसा ।।
पाहू ऐकू बोलू नका वाईट आरसा पाहून । चिंतामणीला शरण जा ही किलवरची खूण ।।५

मनांत बोलतो मी भाजीत तुम्ही भाजी खाणार । मी बसलो वाद्यात तुम्ही कुणाला वाजवणार ।।
पशु पक्षी चिडले तर भांडी अंगावर येणार । सुखकर्ता दुःखहर्ता ही आरती कुणाची होणार ।।६

भाजी भांडी हे जगण्याचे असे हो साधन । वाद्य हे देव मानवा करमणूकीचे साधन ।।
पशु पक्षी हे जिवंत असता त्यांना चित्रासन । कलाकारा घडव देवमूर्तीचे ध्यानदर्शन ।।७।।

कलाकृतीचे कौतुक करणें अवश्य आहेच । काव्यात वर्णन केले काव्य कलाही माझीच ।।
कलेचा दाता मी तो माझी मज जवळ आहेच । कलेला वाव इतरत्र तुम्ही प्रयत्न कराच ।।८

चित्तांत तुमच्या मुक्काम माझा निश्चित राहील । बुद्धिपतीला विसरु नका बुद्धी दूर जाईल ।।
शिल्पकारा कलाकारा चित्र हे भक्तिचे आकार । देव मुर्तीच्या या आकारा करुनको गोलंकार ।।९

किलवरचा आरसा समोर ठेवा सावधान । जाता येता बाप्पा पाहातील हो तुमचे गमन ।।
बाप्पा म्हणे माझ्या हाती माझे गमनागमग । तुमचे तुम्ही ठरवा सावधान सावधान ।।१०।।

॥ श्री गणराज समर्थ ॥

# कवी कसा असावा

कविने काव्यातून सांगायचे ।
उगीच नाही भरकटायचे ॥
गद्याचे लांब लचक चऱ्हाट ॥।
आवश्य तेच गुंफावे पद्यात ॥१॥

काव्यात करमणूक असावी ।
सौन्दर्याची विटंबना नसावी ॥
कवि काव्यात प्रतिभा असावी ॥
काम्य वासना ती त्यात नसावी ॥२॥

क्रांती ही काव्यातून घडवावी ।
देश धर्म घातकी ती नसावी ॥
जात पात ही कविला नसावी ॥।
अत्मीयता हो पद्यात असावी ॥३॥

कवि हा राजकारणी असावा ।
काव्यात देशद्रोह हा टाळावा ॥
कवि समाजसेवक असावा ॥।
समाज कंटक कवि नसावा ॥४॥

नवे जुने हे कविने शोधावे ।
प्रसंगावधान मात्र राखावे ॥
अत्म श्लाघी प्रौढी कवि नसावा ॥।
देव तो संकटाचा आठवावा ॥५॥

कवि झाले होतील घरोघरी ।
योग्य अयोग्याची ही मारामारी ॥
बसे सरस्वती ही हृदयांतरी ॥।
जय गजानन म्हणे तिवारी ॥६॥

॥ श्री गणराज समर्थ ॥

# " इंच्छाबाई "

प्रवासात भेट झाली, मी ओळखले नाहीं ।
जवळ येऊन बसली, मला कळलेच नाही ॥
खूप मौज करु आता म्हणते दिसत नाही ॥।
अशी आहे ईच्छा बाई साथ सोडणार नाही ॥१॥

सोबती जन्माची झाली प्रेयसी म्हणून आली ।
हवे ते आणू लागली, नको तेही घेऊ लागली ॥
ईच्छा अवदसा आली, ती घरची लक्ष्मी झाली ॥।
प्रवासात भेटलेंलीं ईच्छाबाई बोलू लागलो ॥२॥

ईच्छा आशा अवदसा, लक्ष्मीचा धरला घसा ।
बाई ईच्छेचा हा वसा, रिता झाला माझा खिसा ॥।
प्रवासी सांभाळून हसा, ईच्छा आशा गिळून बसा॥।
फसवी ही ईच्छा आशा, गळी अडकेल हा मासा ॥३॥

ईच्छा स्त्री ही संगतीला, माया मोहांत फसला ।
जन्म हा मृत्यूने दिला, सुखदुःख भोगू लागला ॥
भोग भोगून शिणला, पश्चातापे होरपळला ॥।
जन्माला आला हा हेला, पाणी वाहतच मेला ॥४॥

खेळ हा ईच्छेने मांडला, त्राण देहातील संपला ।
जातांना तो म्हणू लागला, ईच्छा ये ग तू संगतीला ॥
ही ईच्छा जा म्हणाली त्याला, येतांना तू एकटा आला ॥।
संवाद दोघांचा ऐकला, तात्या तिवारी घाबरला ॥५॥

।। श्री गणराज समर्थ ।।

# ब्रह्म जाणे तो ब्राह्मण

नाव दिले कुणीहो हे जातीचे ब्राह्मण ।
सिंधि मद्रासी कां नांव देशाचे म्हणून ।।
राष्ट्रा साठी नांवे ती जात घ्या समजून ।।।
होते येथे ब्राह्मण भारताला ते भूषण ।।१।।

धंद्यावरुनी पडलेका जातीचे नांव ।
नसे डॉक्टर वकीला जात देश गांव ।।
देश धंद्यामुळे नसे ते जातीचे नांव ।।
रिती भाती पुजासांगे तो हा ब्राह्मणराव ।।२।।

सरदार श्रीमंत इंजिनियर साहेब ।
गरीब धोब्या तेल्या म्हटले कां साहेब ।।
जाती देशा मुळे तो होत नसतो साहेब ।।।
झाले असंख्य ब्राह्मण, येथे भाऊसाहेब ।।३।।

वैश्य शुद्र क्षत्रिय वर्ण असे ब्राह्मण ।
कोळी नामा वाल्या असे असंख्य दुर्जन ।।
सर्व झाले तपश्चर्येने पूज्य ब्राह्मण ।।।
कर्माने ठरविली ही जात ब्राह्मण ।।४।।

मुखे मृदु सत्य बोला मुख असे ब्राह्मण ।
हात करी संरक्षण हात क्षत्रिय जाण ।।
पचवून अन्न पुरवी, पोट वैश्याची खाण ।
आपण आपुली घाण काढी तो शुद्र जाण ।।५।।

ब्रह्म जाणतो सांगतो तो बसला ब्राह्मणात ।
संरक्षी देश धर्माला असे क्षत्रिय सैन्यात ।।
वैश्य शूद्र प्रामाणीक, शुद्रत्व नसे मानवात ।।।
तात्या तिवारी म्हणतो कशाला जातीची खंत ।।६।।

# जातीची खंत

देवही एक आहे  धर्मही एक आहे ।
मनुष्य धर्म आहे  धर्म कर्तव्य आहे ॥
जात जिवंत आहे  मृत्यू येणार आहे ।॥
आत्मा अमर आहे जन्म होणार आहे ॥१॥

ब्राह्मणा घरी जन्मतो  ब्रह्म माहींत नाही ।
झोपडींत जन्म घेतो  म्हणून शुद्र नाहीं ॥
जन्मतो डॉक्टरा घरी  डॉक्टर होत नाही ।॥
मानव जात आहे  जन्म हातात नाही ॥२॥

जन्मा श्रीमंता घरी  श्रीमंती ही जात नाही ।
लक्ष्मी प्रयत्ने साधा  दारिद्रय राहात नाही ॥
नशीब चक्र आहे  जिवनांत सुख नाही ।॥
दैवी दुर्दैव आहे  दैवालाहीं जात नाही ॥३॥

केल्याने होत आहे  आधि केलेच नाही ।
ब्रह्म ब्रह्मांड आहे  ते समजणार नाही ॥
देव ब्राह्मण आहे  ब्रह्म बोलणार नाही ।॥
मानव ही जात आहे ब्राह्मण ही जात नाही ॥४॥

धर्म हे कर्तव्य आहे  ज्ञानांत देव आहे ।
देवात दैव आहे  दैवी नशिब आहे ॥
नशिब कर्मात आहे  क्रीयेत कर्म आहे ।॥
समाज ऋण आहे  तात्या फेडीत आहे ॥५॥

॥ श्री गणराज समर्थ ॥

# निसर्गाचा शोध

पंच तत्वि भूते महाभूते, चंद्र सूर्य तारे ।
लयी प्रलयी असती तेथे, उष्ण शीत वारे ॥
आप तेज वायु पृथ्वी, आहे भोवतीं आकाश ॥।
रूप रस गंधादि असे उष्ण शीत प्रकाश ॥१॥

पृथ्वी वसती पशु मानव हे जिव बिचारे ।
सर्वंच येथे जगती, आपापल्या कर्माधारे ॥
नित्य हे चंद्र सुर्यादि अपुले ते कार्य करती ॥।
आज्ञा ही अनंता द्वारे त्या निसर्ग नियतीची ॥२॥

नियंत्रण या सर्वांचे निसर्ग करतो समजू या ।
मनी शंका अशी कां येते तिलाही शोधून पाहू या ॥
नित्य हा व्यवहार सृष्टीचा सुरळीत कां चालतो ॥।
प्रलयाग्नी धरणी कंपे असंख्य जिवा कां गिळतो ॥३॥

कुणी म्हणतो दैव कोपले, कां हे निसर्ग कोपले ।
क्रीया घडते ती निसर्गाने, नियतीची ही पाऊले ॥
नियतीनें जवळ आले, निसर्ग हे दैव गतीचे ॥।
दैवाधीन क्रीयाही घडते, नांव मात्र निसर्गाचे ॥४॥

असंख्य दुर्दैवी जिव भक्ष ठरतीं या नियतीचे ।
सुखे चिरायू सर्व जगती, हे कार्य मग कोणाचे ॥
आज्ञा कारी हा नियंता, नियती आपले कार्य करी ॥।
दैवी दुर्दैवी जिवांची, निसर्गाने धरली ही दोरी ॥५॥

आजे पणजे आदि मानव तसेच नातू पणतु ।
निसर्ग जमवितो सगळे हे भूत काळाचे जंतु ॥।
जो निसर्ग राजाचा शोध करतो, त्याला धन्य म्हणा ॥।
आयू मोठे निसर्गाचे तात्या तिवारी करी गणना ॥६॥

॥ श्री गणराज समर्थ ॥

# "मंत्र आणि यंत्र"

मंत्र म्हणाहो मंत्र म्हणा, मंत्र असे हा सोपा ।
सोबत त्याची मानवा, चुकवी जन्मांच्या खेपा ॥
बसल्या जागी मंत्रायोगे, सर्वही प्राप्ती होते ।॥
संयमे पळते भिती, आरोग्याचे साधन ते ॥१॥

मंत्र प्रभावे फिरले मानव, सर्वत्र याच आकाशी ।
तिन्ही लोकी फिरले नारद, नारायण मंत्र जपाशी ॥
पुराणी सुर्य गिळीला मारुते, ऐसी कथा इतिहासी ।॥
रेडा बोले भितही चाले, ज्ञानेश्वर सांगे मंत्रासी ॥२॥

मंत्रानी शस्त्रास्त्रे करुनी प्रभावी, केले शर संधान ।
या मंत्रांनी ही शस्त्रास्त्रे, उडविती शत्रूंची दाणादाण ॥
हर हर महादेव या मंत्राची ही भवानी तलवार ।॥
विसरुं कसे या मंत्रांना, ज्यांनी केला राष्ट्र आत्मोद्धार ॥३॥

आता यंत्र म्हणा यंत्र म्हणा, खर्च मोठा तसाच धोका रे ।
कष्ट कमी वेळ थोडा दाबा बटण कामझटपट रे ॥
कामे झटपट होती यंत्राने, मानव झाले आळशी रे ।॥
अवजड यंत्र खर्चीक मोठे, तसे न परवडणा रे ॥४॥

यंत्रानें मानव झाले धन्य, ते करती चंद्रावर स्वारी ।
भित भित माकड कुत्र्यांनाही, प्रथम घडली स्वारी ॥
मग गेले स्कायलॅब, मुदत संपता कोसळलेरे ।॥
खर्च अवाढव्य प्राण घातक, रचना सर्व अफाट रे ॥५॥

मंत्र म्हणा वा यंत्र म्हणा प्रसंगी, ज्याला जे वाटे सोपे ।
मंत्र यंत्र शिका शिकवा, उपदेशाचा हा मंत्र असे ॥
आळस अज्ञान टाका तो, समजून घ्या यांचे हो नाते ।॥
भाऊ भाऊ दोघे म्हणे तिवारी, हे युगायुगाचे नाते ॥६॥

---

श्री ज्ञानेश्वर ज्ञान मंदीर कल्याण यांचे सन १९८३ च्या उत्सवांत सादर केलेली कविता.

॥ श्री गणराज समर्थ ॥

# " शांती "

हे प्रिये मी तुला शोधत आहे ग, मला तूं केंव्हा कुठे भेंटशील ग। धृपद ॥

रानांत शोधले बागेत पाहू का, प्रिये तुझी माझी भेट होईल कां।
मी या जिवनाला कंटाळलोय ग, मनातल काहूर तू थांबव ग ।१।

हे प्रिये माझ्या जवळ येशील कां, जन्म मृत्यूचे गणित सुटेल कां।
गाद्या गिर्द्यांत तर तू नाहीस ग, सोन्या नाण्यातही तू नसणार ग ।२।

हे प्रिये एक काळ असा होता ग, सर्वांना तू हवी हवी होतीस ग।
येथे येणारे खाणारे खूप होते, निर्मळ धान्य पण अमाप होते ।३।

प्रिये स्वस्तायीचा काळ होता ग, लोकखंख्या कमीच होती ग।
महागाईत माणसे कां वाढली, तू नसल्यामूळे ही क्रीया घडली ।४।

हे प्रिये मी पुन्हा पुन्हा येत आहे, झोपडे बंगले हें शोधत आहे।
मी तोच ग आता ती होऊन आले, तुझ्यापासुन फारच लांब गेले ।५।

प्रिये तू बहिण आहेस की आई, मी या जीवनाला कंटाळले बाई।
प्रीयकर तुझा पत्ता देईल ग, आपली तिघांची भेट होंईल ग ।६।

प्रिये तुझ्या पासुन जे लांब गेले, बाई बाटलीने त्यांना गुंतवले।
वर मजा खालती काळजी नसते, मधल्यांना तुझी आठवण येते ।७।

प्रिये आत्म्याची ओळख आहे का ग, श्रद्धांजलीत तुला मागतो का ग।
माणसे ही खूप आली व गेली ग, तू कधी कोणाला नाही भेटली ग ।८।

तात्या तिवारींना प्रिया भेटली कां, पत्ता तिचा सर्वांना सांगतील कां।
मोक्षमुक्तीच्या चौकात हिचे गांव, चारीस्थानी आहे शांती तीचे नांव ।९।

हे प्रिये शांती मी तुला शोधल ग, आता तू अशी लांब राहु नको ग ॥

।। श्री गणराज समर्थ ।।

# "चूप बसा"

लहानपणी घरातील म्हणतात चूप बसा ।
ऑफिसातील सिनीअर ते ही म्हणतात चूप बसा ।।
पेन्शनर वृद्ध झालो, सुनामुले म्हणती चूप बसा ।।।
चूप बसणे जमले नाही पण शिर्षक दिले चूप बसा ।।१।।

राजकारण बोलू नका, असे हे बंधन ।
धर्म कारण सांगू नका 'अ' त्याचे कारण ।।
जास्त लिहू बोलू नका ते सर्व जाते वरुन ।।।
डिगरीं डिप्लोमा नाही हेच ते खरे कारण ।।२।।

व्याख्याने प्रवचने लांब लचक मन मुराद देती ।
असे गडगंज शिवाय डिगरी डिप्लोमाही हाती ।।
उपदेश सांगती खूप, ऐकतां खूर्चीला येतो घाम ।।।
श्रोते आम्ही चूप बसतो, हाच आमचा मान ।।३।।

वृद्धांचे वर्ष जन्मा आले कां, आता होईल स्वागत ।
मन मोकळे करुन सांगू कां, वृद्ध व्यथेचे भागवत ।।
मुस्कट दाबी पुरे झाली, आता सोडू द्या हे मौन ।।।
भावि पिढीला शिकवू काही, फूला मुलांत बसून ।।४।।

सगळे वृद्धच नसती हे, चूप बसलेले म्हातारे ।
चला उठा काही करा, नवा जन्म आपला झाला रे ।।
काया पालट करुन घ्या, हे वृद्धांचे पर्व आले रे ।।।
शरीर उद्धार खूप केला, साधा आता आत्मोद्धार रे ।।५।।

लहानपण संपले, संपले चूप बसा म्हणणारे ।
सेवा निवृत्तीने स्वातंत्र्य दिले, चूप कसे बसलारे ।।
समाज सेवेत विसरूं नका, आपली आत्मोन्नतीरे ।।।
जेष्ठ नागरिकसंधी, संदेश देतो हा तात्या तिकारीं रे ।।६।।

।। श्री गणराज समर्थ ।।

# वाढत्या लोकसंख्येवर पर्यायी उपाय

मला काही सांगायचय, तुम्हाला ते ऐकायचय कां ।
लोक संख्या खूप वाढलींय, ती वाढवीत राह्यचे कां ।।
म्हाताऱ्यांना घालवू नका, येणारी तरी थांबतील कां ।।।
आपण सगळे ऐकाल कां, माझा विचार सांगू कां ।।१।।

बाप व्हा, आजे व्हा जाल तेव्हा सांगा, पुन्हा येणार नाही ।
आत्मा अमर आहे कसे हो सांगू, पुन्हा येणे होणार नाही ।।
मृत्यू होतो, कुठे जातो, अद्याप कोणी सांगितले नाही ।
जन्म मरण होतच रहाणार, ते चुकणारे नाही ।।२।।

लोक संख्या वाढत आहे कमी करा, कोण ऐकणार ।
ज्यांचे घरी जन्म घडत नाही ते कमीच असणार ।।
सत्कर्मे मुक्ती साधा पुन्हा येणे निश्चित टळणार ।।।
देवाद्वारी उभा क्षण भरी मंत्र हा केव्हा पटणार ।।३।।

लोक संख्येला आवर घाला, सांगत आहे हा त्रिकोण ।
कुटूंब छोटे सुख मोठे हो, उपदेशाचा हा चौकोण ।।
त्रिकोण हे साधन मदतीला, मोक्षाची असू द्या जाण ।।।
सत्कर्मे पाळा नियम संयम, हीच मोक्षाची खाण ।।४।।

खरे सांगतो हा पहा, सत्कर्माचा हिरवा कंदील ।
हाती धरु नका अविवेकीं, अकर्माचा लाल कंदील ।
हिरव्या कंदीलाच्या उपयोगे, उघडे स्वर्गांचे दार ।।।
लाल कंदील गळयात तुमच्या घाली, चौऱ्यांशींचा हार ।।५।।

साह्य करा हाती धरा, सत्कर्माचा हिरवा कंदील ।
माघारीं फिरवेल तुम्हांला हा अकर्मी लाल कंदील ।।
तुम्ही खाली येणार ओळख नसणार आपण कोण ।।।
येथे वशींला हप्ता चालत नाही, सांगे हा त्रिकोण ।।६।।

वरती गेलो लाल कंदील, खाली आलो लाल त्रिकोण ।
सत्कर्म आता नक्की करीतो, येऊदे राजा त्रिकोण ।।
त्रिकोण म्हणे माफ कर, लोक संख्येचा विचार कर ।।।
येथे होता मौज केली, आता त्याचा हिशोब पुरा कर ।।७।।

ग-गच्छा ज-जन्मा गज ही युती, तेथे हे कर माझे जुळती ।
श्रीं गजानन जय गजानन, तात्या तिवारी नित्य म्हणती ।।८।।

॥ श्री गणराज समर्थ ॥

# "सगळेच अपराधी"

( जेलमधल्या बांधवांना संदेशपर दिलासा )

जय गजानन जय जवान जय गजानन जय किसान ।
आठवू हुतात्म्यांचे बलीदान, पडले देशासाठी ते जवान ॥
वीर माता पत्नींचा करु सन्मान, त्यांचा आहे हा देश हिंदुस्थान ॥।
जागो भारतीयांचा अभिमान, सबको सन्मती दे भगवान ॥१॥

सुजलाम् सुफलाम् हा भारत नित्य कसाहो राहाणार ।
पाहुणे किती आले खाऊनी गेले हे घर घराला खाणार ॥
धारण करुनी ही वस्त्रे भगवी बुवाबाजी ते करणार ॥।
तुमचाच पैसा तुमची पागडी ते मालक घर देणार ॥२॥

व्यापारी व्यापार भेसळीचा बाजार, भाव वाढतच राहाणार ।
डॉक्टर वकील हे वाणी व्यापारी, बिलात बील लावणार ॥
भारत देशीचे सगळे मानव, स्वार्थासाठी ते जगणार ॥।
सगळे दैवी दुर्दैवी स्वार्थी मानव, हे अपराधीच ठरणार ॥३॥

मद्य पिऊ नका चोरी करु नका नकाहो खेळू जुगार ।
मनाने कुठेही असा आंत बाहेर, ते सगळेच गुन्हेगार ॥
शासन बिचारे कष्ट करणार गुन्हे कितीं आवरणार ॥।
देश भक्तिचे हे नुसते मुखवटे येथे साथ नाही देणार ॥४॥

तुम्ही आंत असा वा बाहेर असा, करा हो मनाचा निर्धार ।
सत्य अहिंसा मनी बाळगा, होईल राष्ट्राचा उद्धार ॥
अल्लाही तो, गॉडही तो, हा ईश्वर, सर्वांना सन्मती देणार ॥।
देशभक्तिचे नाटकी मुखवटे, आपोआप गळणार ॥५॥

व्यसने दूर्व्यसने ही सारा बाजूला, पहा घडेल साक्षात्कार ।
शासन भाऊहा सखाहो तुमचा, कौतुक तुमचे करणार ॥
जनता तुमची ही आई तुम्हाला तीच कुशीत घेणार ॥।
जय भारत जय हिंद, तिवारी वंदेमातरम् म्हणणार ॥६॥
जय गजानन जय जवान, जय गजानन जय किसान

।। श्री गणराज समर्थ ।।

# "कुष्टी जिवांना दिलासा"

कुष्टी जिवाला मन आहे का मन ।
अधि व्याधिने पिडले त्याचे तन ।।
पाहून सुदृढ मानवांचे जीवन ।।।
होरपळते कुष्टी जिवांचे मन ।।१।।

मेजवान्या लग्न सणांच्या पाहून ।
समाधानी कुष्टी उपाशी राहून ।।
मोठी घरे बंगले घेतो पाहून ।।।
कुष्टी झोपतो कुठे तरी जाऊन ।।२।।

कुष्टी उठला लागली त्याला भूक ।
नाही घर दारा तो बसला चूप ।।
हे कुष्टी जिवा तूं स्वतःला ओळख ।
मन सांगते तुला चल तू भटक ।।३।।

हे जिवा जरा कडे कडेने चल ।
लोकांची चंगळ तू पाहात चल ।।
कुष्टी जिवांची नसे त्यांना चाहूल ।।।
चल जिवा चल टाक पुढे पाऊल ।।४।।

कुष्ट निर्मूलन आता होईल कां ।
धीर सोडू नको कुणी म्हणेल कां ।।
हे जिवा लवकर चलशील का ।।।
चाहूल कुणाला तरी लागेल कां ।।५।।

कुष्टी जिवा असा घाबरु नको रे ।
मानव तुला जवळ घेतील रे ।।
तो बघ इकडेच येत आहे रे ।।।
मी तिबारी, तुम्हाला पत्ता देतो रे ।।६।।

मुंबईत संशोधक बसले रे ।
धर्मेन्द्र वारदेकर अॅन्टीनीं रे ।।
डॉक्टर कुष्ट निर्मूलन करणारे ।।।
श्रीगणपती आणि पटवर्धन रे ।।७।।

वरेरा ग्रामी कुष्टांचे आश्रम रे ।
बाबा आमटे करी संगोपन रे ।।
हे कुष्टीं जिवांनो घाबरू नका रे ।।।
मानव तुम्हांला जवळ घेतील रे ।।८।।

मानवांत आता जांगृती झाली रे ।
चौकशी घरोघरीं करतील रे ।।
स्त्रीपुरुषांनो संकोच तो टाका रे ।।।
कुष्टरोग आपला नका झाकू रे ।।९।।

कल्याणी आपली भारत भूमी रे ।
ग्रामोग्रामी केंद्र उघडे आहे रे ।।
भेटतील उपचार करणारे।।।
कुष्ट निर्मूलन नक्की होईल रे ।।१०।।

॥ श्री गणराज समर्थ ॥

# "हम सब एक है"

हम सब एक है, हम सब एक है ।
अंदरसे अलग है, बाहर कुछ और है ॥
बुरा ना मानो भैया, बाहर सब एक है - हम सब एक है, हम सब एक है

मीठी बाते करते है, हसना खाना अलग है ।
मुखडा इनका एक है, अंदर सोला बत्तीस है ॥
बुरा ना मानो भैया, एकेक निवाला खाते है - हम सब एक है, हम सब एक है

नारी चटक मटक चलती है, जवानी अपनी दिखाती है ।
जवान पिछे चलते है, हँसी मजाक उडाते है ॥
बुरा न मानो भैया बहन भाईको भूलती है, हम सब एक है, हम सब एक है

जवान रस्ता चलते है, माँ बहनको भूलते है ।
माँ बहन सबको है, जोरु उसमें न्यारी हैं ॥
बुरा न मानो भैया जोरु होनेवाली माँ है - हम सब एक है, हम सब एक है

काँचकी चुडीयाँ बहन है, राखी भैय्याका मनगट हैं ।
ईराणसे राखी आयी थी, हिंदुस्थाने बांधी थी ॥
बुरा न मानो भैया बहन भाईकी राखी है - हम सब एक है, हम सब एक है

ईन्सान हैवान होता है, भले बुरेकी दुनिया है ।
मालिकनें ये बनवाई है, इन्सान एक खिलौना है ॥
भगवान हैवान एक है, दोनोका प्राण आत्मा है-हम सब एक है, हम सब एक है

ईन्सान एक पिंजरा है, भगवान उसीमे बिठाना है ।
सबको एक होना है, हैवानको दिलसे भगाना हैं ॥
झूठ मत बोलो भैया राम रहिमके पास जाना है ।।।
सच्चे दिलसे एक होना है, तात्या तिवारी का कहना है -
हम सब एक है, हम सब एक है

॥ श्री गणराज समर्थ ॥

# "भिंतीला कान असतात"

चार कान नेहमी हित गुज करतात ।
केव्हा तरी ते दोघे अपसांत भांडतात ॥
बिनसल की मोठमोठ्याने ओरडतात ॥।
कागाळ्या एकमेकांच्या सगळ्यांना सांगतात ॥१॥
आपण म्हणतो भिंतीला कान असतात

पदर उघडा चेन साखळ्या दिसतात ।
लक्ष ठेवणारे रस्त्यावर असतात ॥
बोलण्याच्या नादांत मंगळसुत्रे जातात ॥।
हाताला डोळे व डोळ्यांना कान नसतात ॥२॥
आपण म्हणतो भिंतीला कान असतात

जोडप्यांची बोलणी रात्री चालू असतात ।
झोपलेली मुले कान उघडे ठेवतात ॥
पप्पा मम्मींचे बोलणे ते पाठ करतात ॥।
भवितव्याचे कान भांडवल ठरतात ॥३॥
आपण उगीच म्हणतो भिंतीला कान असतात

बहीऱ्या सासूबाई फाड फाड बोलतात ।
छायागीत सुरु झालें की गप्प बसतात ।
कान बघत नाहीं, डोळे मात्र ऐकतात ॥।
सुना मुली पासून त्या लांब राहातात ॥४॥
आपण उगीच म्हणतो भिंतीला कान असतात

ह्या तरुण मुलामुलींना डोळे असतात ।
शिव्या चपला खाणारे ते कान नसतात ॥
सवयीने लाईन मारायला शिकतात ॥।
दोघांचे चार कान गुलुगुलू बोलतात ॥५॥
आपण उगीच म्हणतो भिंतीला कान असतात

दारा खिडकींना फटींचे डोळे असतात ।
भिंतीला रेडिओ फोनची तोंडे असतात ॥
बोलक्या तोंडालाच डोळे कान असतात ॥।
आपण म्हणतो भिंतीला कान असतात ॥६॥
तात्या तिवारी जय गजानन म्हणतात

# आडनावाचा गाथा

श्री माटे, ताटे, तोटे, काटे, सराटे, खोटे, बाराबोटे, आमटे, भामटे, चिमटे, गोगटे, आपटे, पुंड, गुंड, श्री तांबे, लेंबे, शेंबे, वाळींबे, गोडबें, तसे भेंडे, शेंडे, गाडे, फडे, भिडे, बडे, हेडे, मेढे, खाडे, घोडे, हेगडे, तिरपुडे, श्री खाकरे, भाकरे, ठाकरे, डोंगरे, शिंगरे, भिगरे, मुंगे, हिरे, मोरे, भांगरे, ढापरे, गोरे, खरे वगैरे अशी असंख्य आडनावे आहेत. यांत कुणाचे घेतले म्हणून किंवा चूकून राहीले म्हणून क्षमस्व. पण कर अडनावाने सर्व गावांची नावे व्यापून टाकली नाशिककर, पुणेकर असे हे कर गांव सोडल्यावरही गांवाचे नांव लावतातच. असे हे कर नांव चंद्रावर वस्तीकरुन बाहेर पडल्यावर चंद्रकर होणार नाही आणि कैलासकर, स्वर्गकर, वैकुंठकर, पाताळकर, असे हे जन्मकर, मृत्यूकर, नर्ककर नांव कधीच लागणार नाही कारण ते पूर्वी तेथे होते हे त्यांना माहित नसते. अशी सर्वच गांवे करनावाने प्रसिद्धीला येत नसतात व आडनांवा प्रमाणें सगळे नांवाप्रमाणे नसतात, काही अपवाद असतात अशी ७/८ नांवे येथे कवितेसाठी वेचलेली देत आहे.

१

खरे– मनाने स्वच्छ व्यवहाराला चोख
नसे उसने उधार सगळे रोख
घराणें बाळबोध सगळेच बरे
असे आम्ही आडनांवाचे खरे

२

खोटे– सासर फार छान लाभले मला
साले सासू सासऱ्याचा लळा
देणार काही नाही बोलणें मोठे
सासूरवाडीचे आडनांव खोटे

३

काटे– मुलीचे सासर फारच चिकट
घरातील मंडळी सर्व अचरट
सासूरवासाचे अभ्यासू मोठे
नंतर कळले त्यांचे नांव काटे

४

कुळकर्णी– मुलाचा संसार सगळा अंधार
व्याही विहीण यांच्या शद्वांची धार
नशीबाच्या शापांची लाभली कर्णी
खरे नांवाला भेटले कुळकर्णी

५

गोरे– ऑफिसर तो स्वभावाने तिखट
पोशाख नेहमीचा हा मळकट
रंगाने तसे मनाने काळेबेरे
दैव गतीनेंच नाव दिले गोरे

६

काळे– हेडक्लार्क स्वच्छ आणि गोरेपान
कामांत ते मग्न नसे मानपान
पोशाख स्वच्छ मनाचे तसे भोळे
नशीबाने दिले नांव मात्र काळे

७

भोळे– या क्लार्क बाई ऑफिसात हुषार
वृत्ती चंचल तशा तडफदार
माहेरचे नांव त्यांचे होते गोळे
येथे चूकून नांव पडले भोळे

८

लांडगे– प्यून ऑफिसातला पिणार नाही
चहा पाणी नको म्हणणार नाही
कामचुकारी विचार हे दांडगे
म्हणे तिवारी नांव त्याचे लांडगे

(जेष्ठ नागरिक संघ कल्याण आयोजित ५८ ते ६५ व ६६ ते ७५ पर्यंतचे वयोवृद्धांचीं जलद चालण्याची स्पर्धा प्रसंगी केलेली कविता. )

# " पुकारा "

आले वृद्धांचे वर्ष अता, पुकारा माझा ऐकारे ।
सेवानिवृत्त येथे जमले, हे तरुण म्हातारे ।।
काया पालटेल तुमची, नवा जन्म समजारे ।।।
यारे सर्व सेवा निवृत्तांनो, संदेश हा ऐंकारे ।।१।।

जमले जेष्ठ नागरिक, हे सर्व तरुण म्हातारे ।
येतील जे सेवा निवृत्त, स्वागत त्यांचे होईलरे ।।
रोटरी क्लबे प्रेरणा, सिनियर सिटीजनद्वारे ।।।
करुया काही समाजसेवा, कंबर आता बांधा रे ।।२।।

साठी सत्तरीचे तरुण म्हातारे, जलद चालले रे ।
राजे, देशपांडे, मुळे मुंगरें, घाणेकर चमकले रे ।।
किमया ही तरुण म्हाताऱ्यांची, आकाशवाणी बोले रे ।।
रोटरी क्लबे जेष्ट नागरिके, कौतुक त्यांचे केले रे ।।३।।

कुणी धांवती पोहती, कुणी हासती, हासवती ।
हळु मुंगरे मधे मुळे, जलद तिवारी दिसती ।।
हे सर्व साठी सत्तरीचे, असे तरुण म्हातारे ।।।
विचारा अपुल्या मनाला, झाले काहो ते म्हातारे ।।४।।

छोटा मोठा धोती चड्डी, नसे येथे अविष्कार रे ।
मर्म झाली निद्रा केली, नका करु मन हे म्हातारे ।।
शिका व शिकवा मंत्र मुद्रा, प्राणायाम आसन रे ।।।
शरीर उद्धार खूप झाला, आता साधा आत्मोद्धार रे ।।५।।

यारे यारे सेवा निवृत्तांनो पुकारा तिवारीचा ऐकारे

॥ श्री गणराज समर्थ ॥

२५२८ दि. क्र. गाय २५०२३ १५५८९ शाखा स्थळ

# "मानवाचे भवितव्य"

आजचा तरुण, पुढे पुढे चाल्लाय, जूने तो विसरलाय ।
बापाचा बाप, आज्जा पण ज्यांचा बाप, म्हणतो जूना झालाय ॥
नवा हा तरुण, झाला जूना म्हातारा, येथे भरकटलाय ।॥
गेले जूने सोने, आले चौदा कॅरेट, चकाकीला भुललाय ॥१॥

आजचा हा युवक खूप सुधारला, पुढे पुढे चालला्य ।
लग्नाची नको घाई, मारतो लाईन, खूप म्हणे शिकलाय ॥
केव्हा कसे खायचे, पैसे कुठे, सर्व जुगारीत हारलाय ।॥
ऐकायचे कुणाचे, बोलायचे कसे, गल्लींबोळे फीरलाय ॥२॥

पुर्वीचा युवक, सर्व्हिसला लागला, विचारात पडलाय ।
पुरे आता शिक्षण, नको ती लाईन, तो आता बाप झालाय ॥
एक दोन तीन, पुरे झाले आता, खर्चाला तो घाबरलाय ।॥
संसारी विटला, तरी चिकटला, प्रकृतीने ढासळलाय ॥३॥

त्याहीं पुर्वीचा युवक, साठीला आला, तो जागा विसरलाय ।
नातू झाला, पणतू पाहू म्हणतो, दम्याने घाम धरलाय ॥
पुढे जातांना गेला तो मानव, शेवटी राम विसरलाय ।॥
म्हणे तिवारी, जो येथे "श्री" विसरलाय तोच घसरलाय ॥४॥

॥ श्री गणराज समर्थ ॥

# दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिराजींना

# भावपूर्ण श्रद्धांजली

**काव्य किरण मंडळ कल्याज अयोजीत शोक सभा दिनांक ११-११-८४**

**स्थान :- श्री. एन. एन. (नाना) पाटील, दत्त आळी, कल्याण**

**रचना :- र. ह. तिवारी, कल्याण.**

---

अतिव दुःख झाले माझ्या मनाला ।
हा राजा प्रजेला सोडून कां गेला ॥
कोण विचारील या दैव गतीला ।।।
इंदिरा पुन्हा भेटेल कां भारताला ॥१॥

हा भारत असंख्य रत्ने प्रसवला ।
बापू नेहरू शास्त्रींनी तो भूषविला ॥
त्यांनीच भारत माझा स्वतंत्र केला ।।।
इंदिरा पुन्हा भेटेल कां भारताला ॥२॥

दास्यत्व, हा भारत बहू काळ भोगला ।
धन्य ते हुतात्मे ज्यांनी प्राणार्पण केला ॥
सौभाग्याचा होम, भारतीनारींचा झाला ।।।
इंदिरा पुन्हा भेटशील कां भारताला ॥३॥

राष्ट्रीय एकात्मतेचा हा विडा उचलला ।
सर्व धर्म समभावाचा मंत्र जोपासला ॥
कार्यक्रम वीस सूत्री अखंड राबविला ।।।
इंदिरा पुन्हा भेटशील कां भारताला ॥४॥

भारत असंख्य, रत्ने, येथे प्रसवला ।
एकेक मौल्यवान हीरा, गळू लागला ॥
श्रद्धांजली ही वाहतो मी इंदिराजीला ।।।
इंदिरा पुन्हा, भेटशील कां भारताला ॥५॥

प्रार्थना माझी गळ्यातील चिंतामणीला ।
ज्याने गौरविले या भारतीय नारीला ॥
दे चिरशांती, आत्मशांती, देहमुक्तीला ।।।
ही भाव श्रद्धांजली इंदिराजी तुम्हाला ॥६॥

काव्य किरणी समुदाय येथे जमला ।
शब्द शेष नसे तुझ्या आदरांजलीला ॥
श्रद्धांजलीसाठीं शोधे तिवारी शब्दाला ।।।
ही भाव श्रद्धांजली इंदिराजी तुम्हाला ॥७॥

दे चिरशांती सर्व दिवंगत देश भक्ताला ।
शहीद हुतात्मे, त्यावीर मातापत्नीला ॥
श्रद्धांजलीही, जे पडले, युद्ध दंगलीला ।।।
श्रीचरणी गातो मी, काव्य श्रद्धांजलीला ॥८॥

श्रीमती इंदिरा गांधी यांचे वरील अमानूष निर्घृण हत्येबद्दल मी तीव्र निषेध करतो.

श्रीगांधी नेहरू सर्व कुटुंबियांचे दुःखात मी आणि माझे सर्व कुटुंबिय सहभागी आहोत. देशकार्याची धुरा आणि संकटांची परंपरा यांना सामोरे जाण्यासाठी श्री राजीव गांधी यांना धैर्य लाभो आणि दिवंगत पंत प्रधान श्रीमती इंदिराजींच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच श्रीचरणी प्रार्थना.

**सर्वांचे शुभ चिंतन.**

**रघुनाथ हरिप्रसाद तिवारी**-सेवानिवृत्त (सेंट्रल रेल्वे)
काव्य किरण कवि सदस्य
जेष्ट नागरिक संघ सदस्य, कल्याण

# "नूतन वर्षाचे अभिनंदन"

नूतन वर्ष सुखाचे जावो करितो मी अभिनंदन ।
श्री गजानन जय गजानन हेच खरे शुभचिंतन ।
जूनी वर्षे आली गेली किती झाले गमनागमन ।
जाणारी तर गेली बिचारी येणाऱ्यांचा वृथाभिमान ॥१॥

नविन वर्षं सुखाचे जावो फूकाचे मूखी ते बोलती ।
ईच्छा आशा ही सगळी हे साल मुबारक कां म्हणती ।
स्वैराचारी जिव म्हणती आमचे सुख आमचे हाती ।
दैवी घोडीवर सुख धावते ते नसे कुणाचे हाती ॥२॥

सुखकर्ता हा शक आला आशेने म्हणून जोपासले ।
सुखसमृद्धीचे बीज पेरीन म्हणता वर्षं संपले ।
जाणारे जावो बापुडे नविन वर्षांची तीच पाऊले ।
दैवी घोडीने सुख पळविले नाही कुणाला दिसले ॥३॥

जात देश हा धर्मं निराळा मानव एकजात असे ।
एकमेका साह्य करा जातपातीचे ते बीज नसे ।
मानव कुठला कुणीं असो सुखदुःख हे दैव असे ।
नविन वर्षं येती जाती दैव सुदैवाचा खेळ असे ॥४॥

दैवी लगाम सैल सोडूनी उगीच मानव धावती ।
ईच्छा आशा वादी हे मानव हॅपी न्यू ईयर म्हणती ।
नविन वर्षे सुखाचे जावो फूकाचे मूखी ते बोलती ।
म्हणे तिवारी सुखकर्ता दुःखहर्ता ही मंगल मूर्ती ॥५॥

नूतन वर्षं सुखाचे जावो करितो मी अभिनंदन
श्री गजानन जय गजानन हेच खरे शुभचिंतन

॥ श्री गणराज समर्थ ॥

## श्री क्षेत्र मोरेश्वर (मोरगांव जि. पुणे) येथील नित्यदर्शन यात्रा करण्यापूर्वी (पद्यातून माहिती)

श्री ब्रह्म कमंडलू गंगा स्नान, भाविकांचा असें नेम ।
डोक्याने शिरावे कसे गंगेत, कठीण झालें काम ॥
पवित्र गंगेत कसे घालू पाय, षाशंकीत हे मन ॥।
श्री गणेश गंगा स्मरा आधि, म्हणे तिवारी करा स्नान॥१॥

यात्रेची आहे बस गाडी, जास्त ती थांबणार नाही ।
कसे घडणार गंगास्नान, अष्टविनायकांची घाई ॥
कऱ्हा गंगेत आचमन मार्जन, साधा अपुली घाई ॥।
अष्ट विनायक येथे, म्हणे तिवारी समजून घेई ॥२॥

भाळीं लावा शेंदूर, स्मरा देवगुरु पायऱ्या खालून ।
श्री मयूरेश गाणेश योगीन्द्र गुरु गणेश स्मरुन ॥
पायऱ्या समोर श्री मुषक, अनुज्ञा वंदून साधून ॥।
देऊळांत प्रवेशावे गर्भागारी, घंटानाद करुन ॥३॥

दोन्ही हाताच्या वाळून मूठी, बोटांच्या मध्याग्राकडून ।
शिरी दोन्हीकडे कानावर त्रिवार करा ते ताडन ॥
हस्ते धरा डावे उजवे, उलट दिशेचे ते कान ॥।
क्रीये बरोबर गणेश ध्यान, याला म्हणावे कुट्टन ॥४॥

अष्टांगे देवासमोर साष्टांग, नमस्कार ते कुट्टन ।
नमस्कार उठबशा ताडन, त्रिवार कान धरुन ॥
कुट्टने शिरताडन भूमिवर, तीनवेळा ते करुन ॥।
साधा हा गाणेश नमस्कार, प्रसन्न करा गजानन ॥५॥

---

॥ श्री गणराज समर्थ ॥

# "अष्ट विनायक स्थानांचा भ्रम"

श्री मुद्गल पुराणाप्रमाणें भारताच्या आठ दिशेला सिमेवर (मत्सर, मद, मोह, लोभ, क्रोध, काम, दंभ आणि अहंकार) या आठ रिपूंचे दमण करणारे अष्ट विनायक १ श्री वक्रतुंड, २ एकदंत, ३ महोदर, ४ गजानन, ५ लंबोदर, ६ विकट, ७ विघ्नराज व ८ वे धूम्रवर्ण असे आठ विनायक आहेत. त्यांची स्थाने क्रमाने १ मद्रास, २ केरळ, ३ रामेश्वरजवळ ४ तंजावर ५ पुळे रत्नागीरी ६ काश्मीर शंकराचार्य टेकडीं जवळ ७ हिमालय ज्योतिर्मठाजवळ आणि आठवे तिबेटमध्ये आहे. महाराष्ट्रात रुढ झालेले सिद्धटेक, रांजणगांव, थेऊर, पाली, मढ, ओझर, लेण्याद्री आणि मुख्य मोरगांव असे हे पण अष्टविनायक रुढ आहेत. त्यामुळे अष्टविनायकस्थानांचा भ्रम होतो. त्यांत मोरगांवचे श्री मयूरेश हे जगातील एक कोटी स्थानांपैकी श्रेष्ठ व मुख्य स्थान मानले आहे.

श्री मुद्गल व गणेश पुराणात ब्रह्मांडातील सर्व स्थानांचा उल्लेख आढळतो यात शतकोटी स्थाने असल्याचेही वर्णन ऐकले वाचले आहे. स्वर्गातील मुख्य स्थानास स्वर्ग-स्वानंद म्हटलें आहे· तसेंच पाताळातील मुख्य स्थानाला पाताळ स्वानंद म्हटले आहे त्याचप्रमाणे भूमीवरील मुख्य स्थान म्हणून त्या स्थानाला श्री भूमीस्वानंद क्षेत्र असे म्हटले आहे तेंच हे मोरगांव होय. या दोन प्रकारच्या अष्टविनायकांत भारताच्या सिमेवरच रिपू दमण करणारे आठ विनायक हे श्रीमुद्गल पुराणाधारे निश्चित ठरले वर महाराष्ट्रातील रुढ झालेल्या आठ विनायकातील मोरगांवचे स्थान हे एक निराळे असून ते जगातील मुख्य स्थान ठरते. थोडक्यांत या स्थानांचा शोध घ्यावासा वाटतो.

श्री भक्तराम मल्हारी कृत ५६ विनायकांचा कटाव पाहिल्यावर त्यात महाराष्ट्रातील अष्टविनायक धरुन ५६ संख्या पूर्ण झालेली समजली तसेच श्री गणेश पीठ शाळीग्राम लिखीत १०८ गणेश स्थाने पाहिली. त्यात ही महाराष्ट्रातील आठ विनायक ५६ मधील काही स्थाने काही आपल्या जंबूद्विपाचे बाहेरील द्वीपांची स्थाने आढळली यावरुन अष्टविनायकांचा स्थानांचा भ्रम वाढू नये म्हणून मोरगांवचे स्थान जगातील मुख्य असलेले म्हणून ते मुख्य एक विनायक व भारताच्या आठ दिशेला जे सिमेवर आहेत. त्यांना पूराणआधार असलेनें ते आठ विनायक नंतर शेष स्थानातून मला निश्चित वाचून तसेंच किर्तन प्रवचनातून समजलेली २१ स्थाने समजली ती एकत्र आणून काव्यातून "कटाव" लिहीलेला येथे देत आहे सोबत पुण्याचे श्री. बाबासाहेब ओंकार यांच्या साह्यांने बरीचशी माहिती उपलब्ध झाली त्यातूनच श्री. रा. गो. कानडे गुरुजी पुणें कडून ५६ विनायक आणि पुण्याचे श्री बाबूराव शाळीग्रांम (गणेशपीठ) यांचेकडून १०८ स्थानाची माहिती त्यांनी लिहून दिलेली तशीच येथे त्यांच्या अनुमतींने देत आहे. संख्यापूर्तिसाठी तीच स्थाने पुन्हा घेणें हा विषय निराळा आणि प्रत्येक स्थानांची संपूर्ण माहिती नसली तरीं ते स्थान कोणी व कुठे स्थापीले येवढे तरी वर्णन असावे असे वाटते. श्रीगणेंश पुराण व श्रीमुद्गल पुराणांत सर्व ब्रह्मांडातील स्थानांचे वर्णन आहे पण ते संशोधन करून प्रत्येक स्थानाचे वर्णन असणे आवश्यक आहे. पुढे त्याचा विचार होईल. सांप्रत मिळालेले ५६ विनायक व १०८ विनायकांचे वर्णन येथे देऊन मी रचलेला कटाव "एक आठ आणि २१ विनायक" माहितीसह येथे देत आहे. भाविकास विशेष सुचना अष्ट-विनायकांच्या भ्रमात जेष्ठकनिष्ठ हा भेद राहू नये म्हणून सांगावेसे वाटते महाराष्ट्रातील अष्टविनायक फार पूर्वीचे रुढ झालेले आहेत म्हणून गौण समजण्याचे कारण नाही भारताचे आठ दिशेचे आठ विनायक समजणे व घडणे हे फारच कठीण आहे त्यातून या महाराष्ट्रातील आठविनायक स्थानातच मोरगांव हे जगातील मुख्य स्थांन आहे तेथे भारताचे सिमेवरील अष्टविनायक दर्शन मोरगांवी साधावे. जगातील गणेश स्थानांची माहिती श्री अमरेंद्र गाडगीळ व गोरखपुर गणेश अंकाने प्रकाशीत करुन जगातील काही स्थानांचे सचित्र दर्शन घडविले आहे. त्यावरुन ब्रह्मांडातील व जगातील एक कोटी स्थानांची कल्पना खरी ठरते.

॥ गणराज समर्थ ॥

# एक आठ आणि एकवीस विनायक स्थानांची माहिती

मुख्य एक विनायक हे स्थान पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र मोरेश्वर म्हणजे मोरगांव
ष्टीकार्यासाठींच पंचेश्वरांनी (श्री ब्रह्मा, विष्णू, महेशांनी) ही मूर्ति स्थापीली आहे.

★ मुख्य अष्टविनायकांची स्थाने (भारताच्या ८ दिशेला असलेली) ★

| कोणी कशासाठी स्थापीले ते वर्णन | | | देवतेचे नांव दिशा व स्थान |
|---|---|---|---|
| १ देव ईश्वरांनी | मत्सरासूर | दमणासाठी | पूर्वेला श्रीवक्रतुंड सिद्धिबुद्धिसह मद्रास मध्ये |
| २ ,, | मदासूर | ,, | अग्नेयेला श्री एकदंत सिद्धिबुद्धिसह केरळमध्ये |
| ३ ,, | मोहासूर | ,, | दक्षिणेला श्री महोदर सिद्धिबुद्धिसह रामेश्वर |
| ४ ,, | लोभासुर | ,, | नैऋत्येला श्री गजानन सिद्धिबुद्धिसह तंजावर |
| ५ ,, | क्रोधासुर | ,, | पश्चिमेला श्री लंबोदर सिद्धिबुद्धिसह पुळे |
| ६ ,, | कामासुर | ,, | वायव्येला श्री विकट सिद्धिबुद्धिसह काश्मीर |
| ७ ,, | दंभासुर | ,, | उत्तरेला श्री विघ्नराज सिद्धिबुद्धिसह हिमालय ज्योतिमठ |
| ८ ,, | अहंकारासुर | ,, | ईशान्येला श्री धूम्रवर्ण सिद्धिबुद्धिसह तिबेटमध्ये |

★ एकवीस विनायक स्थानांची थोडक्यात माहिती (कटावाप्रमाणे क्रमांक आहे) – ★

१ विष्णूने मधुकैटभ दैत्यनाशासाठी सिद्धटेक येथे तपश्चर्या केली. ‡
२ शंकराने त्रिपुर वधासाठी रांजणगांवी तपश्चर्या केली. ‡
३ ब्रह्मदेवाने चित्तशुद्धीसाठी थेऊरला तपश्चर्या केली. ‡
४ बल्लाळ नावाच्या भक्ताने पाली येथे स्थापना केली. ‡
५ पार्वती देवीने श्रीं गणेशाने पुत्रत्वाला यावे म्हणून लेण्याद्रीला तपश्चर्या केली ‡
६ कार्तिक स्वामीनें वेरुळ ग्रामी तारकासूर वधासाठी तपश्चर्या केली हे स्थान घृष्णेश्वरजवळ आहे.
७ सुर्याने काशीक्षेत्री तपश्चर्या केली(माळी सुमाळी दैत्यांनी सुर्यप्रकाशाचे कार्य करुन कर्मलोप केला
८ शेषाने आणि कार्तवीर्याने पद्मालय येथे तपश्चर्या केली हे स्थान खान्देशात आहे.
९ इंद्राने गौतमशापमुक्तीसाठी कळंब येथे तपश्चर्या केली हे स्थान वर्धा यवतमाळ मार्गावर आहे.
१० ओंकाराने वेदासह ही मूर्ति प्रयागक्षेत्री स्थीपीली हे स्थान त्रिवेणी संगमाजवळच आहे.
११ पापसंकट शत्रूंच्या नाशासाठी देवऋषीने स्थापीत नागपूरजवळ अदोष क्षेत्र आहे.
१२ मंगळ ग्रहाने स्थापीत पारनेर क्षेत्र प्रसिद्ध आहे. हे स्थान नर्मदातीरी आहे.
१३ चंद्र शाप मुक्तीसाठी सर्व देवांनी स्थापिलेली मूर्ति श्रीं गंगामसले म्हणून प्रसिध्द आहे.
१४ दत्तात्रयाने स्थापित मूर्ति राक्षसभूवन येथे विज्ञान गणेश नांवाने प्रसिध्द आहे.
१५ शिव विष्णू स्थापीत अनलासूर नाशासाठी पुराणांत वर्णन आहे.
१६ देवांतक व नरांतक नाशासाठी कश्यपाघरी झालेला श्री विनायक अवतार प्रसिध्द आहे.
१७ गणेश गिताबोध श्री वरेण्यराजाला राजूर (राजसदन)येथे श्रीगणेज्ञान गणेशगीता सांगीतली.
१८ समुद्र मंथन समयी सुधा गणेश मूर्ति सर्व देवांनी आमृतप्राप्तीसाठी स्थापिली.
१९ जलेशपुरी त्रिपुराने स्थापींलेली मूर्ति पुराण प्रसिध्द आहे.
२० भ्रूशुंडी ऋषीनें स्थापीत मूर्ति नामलगांव येथे आहे.
२१ रतीने कामदहनानंतर पतीप्राप्तीसाठी नाशिकला तपश्चर्या केली गंगेकाठी मोदकेश्वर आहे.

‡ क्रमांक १, २, ३, ४, ५ हीं स्थाने महाराष्ट्रातील प्रसिध्द अष्टविनायकातील आहे.

॥ श्री गणराज समर्थ ॥

॥ श्री भूस्वानंदाधीशो मयूरेशो विजयते ॥



निजे भूस्वानंदे जडभरत-भूम्यां परतरे ॥
तुरीयायास्तीरे परमसुखदे त्वं निवससि ॥
मयूराया नाथस्त्वमसि च मयूरेश भगवन् ॥
अतस्त्वां संध्याये शिव-हरि रवि-ब्रह्म-जनकम् ॥१॥

श्रीक्षेत्र मोरेश्वर (मोरगांव जि. पुणे)


॥ॐ॥
श्री महोदर


॥ॐ॥
श्री गजानन


श्री मयुरेश्वर


॥ॐ॥
श्री एकदंत


॥ॐ॥
श्री लंबोदर


॥ॐ॥
श्री वक्रतुंड


॥ॐ॥
श्री विकट


श्री भुशुंडी महाराज




॥ॐ॥
श्रीविघ्नराज

# " मुख्य एक, आठ आणि एकवीस विनायक " (कटाव)

मोरगांवचे हे श्री मंगलमूर्ति । सगुण निर्गुणाचे ते रुप समष्टी ।।
स्थान प्रसिद्ध हे कऱ्हा तटीचे । मुख्य विनायक हे मोरगांवचे ।।
पंचेशांनी हे प्रथम स्थापित । कथा मुद्‌गल पुराणी ही कथित ।।
योगीन्द्र सेवक हा प्रमोदनाथ । स्मरे भूस्वानंदी हा श्रीगणनाथ ।।(एक विनायक)
गणेश मुद्‌गल पुराण लिखित । अष्ट विनायक ते येथे सांगत ।।
भारत देशीच्या आठ दिशेला । वसले ते हो रिपू दमनाला ।।
नांवे सांगा अपुल्या अंत रिपुंची । होईल सुटका त्यातून तुमची ।।
वक्रतुंड हे मत्सरा सुराचे । एकदंत हो मदासुराचे ।।
महोदर मालक मोहासुराचा । दास लोभासुर हा गजाननाचा ।।
लंबोदरदमवी तो क्रोधासुर । विकट आवरी तो कामासुर ।।
विघ्नराज कृपे दंभ लोपला । धूम्रवर्णे अहंकार झोपला ।।
अपुल्या शरिरी आहे रिपु आठी । अष्टविनायकस्मरा त्या रिपूंसाठी ।।
योगीन्द्र सेवक हा प्रमोदनाथ । नित्य स्मरी तो अष्टविनायक ।। (आठविनायक)
सख्या सांगतो मी ही एकविसांची । साक्ष असे हो ही देवेश्वर संकटांची ।।
सिध्दिविनायक सिध्दटेकचे । महागणपती रांजणगांवचे ।।
चिंतामणी थेऊर ग्रामीचे । बल्लाळ विनायक ते पालीचे ।।
गिरजा वरद ते लेण्याद्रीला । लक्ष विनायक हे वेरुळाला ।।
काशी क्षेत्री वसले ढुंढीराज । वसे पद्मालयी श्री शेषात्मज ।।
चिंतामणी हे कळंब क्षेत्री । ओंकार गणेश ते प्रयाग क्षेत्रीं ।।
वक्रतुंडाची अदोष नगरी । मंगल मुर्ति वसे पारनेरी ।।
भालचद्र हे मांसल क्षेत्रेश । राक्षस भुवनी विज्ञान गणेश ।।
विघ्नराज हे विजय पुरीला । कश्यपाश्रमी विनायक आला ।।
राजूरी सांगे गीता गजानन । श्वेत विघ्नेशी समुद्र मंथन ।।
जलेशपुरी त्रिपूर विनायक । नामल गावी आशा पुरक ।।
नाशिकचे महोत्कट विनायक । एकवीस संख्या ही झाली पुरक ।।
योगीन्द्र सेवक हा प्रमोदनाथ । नित्यस्मरी एकवीस विनायक ।। (२१ विनायक)
देव ईश्वर स्थापीत हे विनायक । येथे एक असे मुख्य आणिक आठ ।।
तसेच हे एकविस विनायक । छपन्न असती आणि एकशे आठ ।।
समष्टी व्यष्टीचा हा भूस्वानंद नाथ । सुरासुरांचा तो वरद विनायक ।।
सुरासुरा दोघा तो भयाभय दायक । सुखकर्ता दुःखहर्ता तो आशापूरक ।।४।।
योगीन्द्र सेवक हा प्रमोदनाथ । भजे मयूरेशी श्री योगीन्द्रनाथ ।।

।। श्री गणराज समर्थ ।।

# " छपन्न विनायकांचा कटाव "

भक्तराम मल्हारी कृत
(श्री बाबासाहेब ओंकार व श्री कानडे यांच्या सौजन्याने)

औट पीठ गत अष्टविनायक । अनंत आकृतीं आशा पुरक । गणराज विराजे कऱ्हातिरी
श्रीमयूरेश्वर मयूरपूरी ।(भजे भक्तराम मल्हारी । प्रातःस्मरण मती विवरी)।। धृपद ।।
सिद्धिटेकीचा सिद्धिविनायक । पल्ली पुरी बल्लाळ विनायक । मुरडों नांदेगत विनायक
चिंतामणी थेऊर रहिवासी । गिरीजात्मक लेण्याद्री निवासी । विघ्नेश्वर ओझर ग्रामवासी
रांजणग्रामी गणपतीवासी ।।१।। श्रीमयूरेश्वर मरयूरपुरी । म्हणें हा भक्तराम मल्हारी (धृ म्हणावे)
राजूरी नगरी श्रीमयूरेश्वर । सिंदूरवाडा सिंदूर प्रियकर । लिंबा गणपति मूर्ति मनोहर
अदोष दशभुज धुंडी मनोहर । खेडी चिंतामणी कपिलेश्वर । माणि धुरंधर पूर्व जनला
उज्जयनी प्रिय गजनना । नर्मदा तटी ओंकार गुणेश्वर । सकल महोदर चोळीमहेश्वर
श्री गजवर गंडकी नगरी ।।२।। (धृ. म्ह.) धुंडी संदर प्रयाग नगरी । वाहन मुषक अयोध्यापुरी
मथुरामाया अवंतिकाची । द्वारका गोकुळ रामेश्वर काशी । बहुरुपाते धारण करुनी
पंच अष्ट छपन्न एकला । धुंडीविराजे अनंत व्याजे । सृष्टी पालन कारण साजे
नामरुप धारण महाराजे । त्रिकूट नगरी दुर्जन उद्धर । उंबरखेडा भवजल गरहर
परळी नांदे पार्वतिईश्वर ।।३।। धृ.म्ह. मुद्‌गल क्षेत्री गणपती पहा । गोळेग्रामि त्रिजगदाधीपा
गणेशवाडी शिवगणेश हा । नामलग्रामि आशापुरक । नवगणपती राजूर एक
पंचमुख गणपती वास्तव नाशिक । आसुरा हरी वासी त्र्यंबक । प्रवाल वासी सिद्धि विनायक
मढी विराजे बुद्धिविनायक । पुळे समुद्रा विकट विनायक । व्यास सरस्वती व्यास विनायक
माहुली नांदे मोद विनायक । पंढरपुरी नांदे व्यापक । अनागोंदी तो श्रीकल्पद्रुम
ब्रह्मपुरीचा तो श्रीगंगोत्तम । कोल्हापुरी तो लक्ष्मीप्रियतम् ।।४।। धृ.म्ह. कऱ्हाडक्षेत्री शिप्रप्रसादन
तारापुरी शनि गर्भ गजानन । सातारी मणिराज गजानन । पुरंदरी तो कश्यप नंदन
पुण्यग्रामी जयती गजानन । गणेशखिडी पार्वती नंदन । लवळे ग्रामी सत्य सनातन
ऐसा अनंत रुपी विघ्नारी । भक्तजनांना साह्य करी ।।५।। (धृपद श्री मयूरपुरीपासून- मती विवरापर्यंत म्हणावे )
श्रीमयूरेश्वर मयूरपुरी । भक्तराम मल्हारी प्रातःस्मरणी । मती विवरी स्मरण करी

श्री जयती गजानन चरणी समर्पण

जयति गजानन कसबा पुणे । अष्ट ब्राह्मण मूळ राहाणे । ठकार कानडे ढेरे ढेकणे
धर्माधिकारी शाळीग्राम गोऱ्हे । कवी पारखी पंडित येणे । नेऊरगांवकर आकुत माणके
आनंदी गोपाळ कानडे पथ । ग्रामसेवक सुनामा देत । जेष्ट पुत्र रामकृष्ण गोव्रती
कथाकिर्तनी फारच प्रीती । छपन्न नामे लिहून देती । ठकार शिरोळे अनगळ गेटी
कानडे गुरुजी सन्माने जाई पिढ्यापंचदश पुण्यात पाहीं । एकूण साठी लिखाण गाठीं
प्रसिद्ध व्हावे लागे पाठी । अष्टविनायक स्थानासाठीं । लेखक तिवारी आले भेटी
एकशे आठ स्थाने गणेशपीठी । शाळिग्राम कानडे ओंकारहाती । छपन्नएकशे आठ लिहून देती
एक व एकविस आणिक आठ । छपन्न निराळे हे एकशे आठ । शोधून पाहू स्थानांचा घाट ।।

# अष्ठोत्तर शत श्रीगणेश क्षेत्र नामावली

( १०८ विनायकांची स्थाने )

(श्री गणेशपीठ बाबूराव शाळिग्राम यांच्या सौजन्याने) (अनुवादक र. ह. तिवारी)

मयुर क्षेत्रे भूस्वानंद चिन्तामणि स्थावरे ।
महागणपति तु मणिपुरस्थ, सिद्धिविनायक सिधिटेकषु ॥१॥

लवण्याद्रि, तु गिरजात्मजं, विघ्नेश्वरं तु ओझरे ।
बल्लाळेश्वरं च पालीषु, महद्वेवरद् विनायकम् ॥२॥

कुरुक्षेत्रे तु लम्बोदरं नैमिषारण्ये तु महोत्कटम् ।
वाराण्यास्यां गजमुखं, गयायां टंक धरिणम् ॥३॥

गंगाहृदये तु गांगेश. श्रीशैले तु विघ्नेश्वम् ।
जम्बकं दण्डकारण्ये लोकेशं हिमवद्‌गिरीम् ॥४॥

मलये हे मकुम्भकं तु विन्ध्याद्रि तु विघ्नेश्वरम् ।
विनायकं पुष्कर द्विपेषु, विघ्नेशं शलमके स्थितम् ॥५॥

विश्वरुपं इलावृत्ते हरिवर्षेच महोत्कटम् ।
सौराष्ट्रे वरदं नित्यं, काश्मिरे भीमरुपिणम् ॥६॥

उज्जनिन्यां तु लम्ब्रोष्ठ मालवे शूर्पकर्णकम् ।
महोदरंच लम्पायां चम्पायां शिखिवाहनम् ॥७॥

त्रिनेत्रं सिंहल द्वीपे श्वेतद्वीपे तु वामनम् ।
गोकर्णे गजवक्रंच, कान्यकुब्जे वराननम् ॥८॥

पाश हस्तं त्रिकुटे तु, पूजयेत सर्वं सिद्धिदम् ।
पद्म सनं कामरुपे, केदारे सर्वंतः स्थितम् ॥९॥

सिन्धु सागरयोर्मध्ये विज्ञेयं मंत्र नाणकम् ।
हर्यक्षं यक्षभवने, कैलासें तु परमेश्वरम् ॥१०॥

महायोगं महेन्दे, तु महिवराहरुपिणम् ।
बलमग्नि गुहायांच पाटलेसिंहवाहनम् ॥११॥

मेरुपृष्ठे कामरुपं, नंदनं नन्दनेश्वरम् ।
पौन्ड्रं देशे तु रुद्रमुखं, जयं कल्याणि ग्रामके ॥१२॥

।। श्री गणराज समर्थ ।।

# " छपन्न विनायकांचा कटाव "

भक्तराम मल्हारी कृत

(श्री बाबासाहेब ओंकार व श्री कानडे यांच्या सौजन्याने)

औट पीठ गत अष्टविनायक । अनंत आकृतीं आशा पुरक । गणराज विराजे कऱ्हातिरी
श्रीमयूरेश्वर मयूरपूरी ।(भजे भक्तराम मल्हारी । प्रात:स्मरण मती विवरी)।। धृपद ।।
सिद्धिटेकीचा सिद्धिविनायक । पल्ली पुरी बल्लाळ विनायक । मुरडी नांदेगत विनायक
चिंतामणी थेऊर रहिवासी । गिरीजात्मक लेण्याद्री निवासी । विघ्नेश्वर ओझर ग्रामवासी
रांजणग्रामी गणपतीवासी ।।१।। श्रीमयूरेश्वर मयूरपुरी । म्हणें हा भक्तराम मल्हारी (धृ म्हणावे)
राजूरी नगरी श्रीमयूरेश्वर । सिंदूरवाडा सिंदूर प्रियकर । लिंबा गणपति मूर्ति मनोहर
अदोष दशभुज धुंडी मनोहर । खेडी चिंतामणी कपिलेश्वर । माणि धुरंधर पूर्व जनला
उज्जयनी प्रिय गजनना । नर्मदा तटी ओंकार गुणेश्वर । सकल महोदर चोळीमहेश्वर
श्री गजवर गंडकी नगरी ।।२।। (धृ. म्ह.) धुंडी संदर प्रयाग नगरी । वाहन मुषक अयोध्यापुरी
मथुरामाया अवंतिकाची । द्वारका गोकुळ रामेश्वर काशी । बहुरुपाते धारण करुनी
पंच अष्ट छपन्न एकला । धुंडीविराजे अनंत व्याजे । सृष्टी पालन कारण साजे
नामरुप धारण महाराजे । त्रिकूट नगरी दुर्जन उद्धर । उंबरखेडा भवजल गरहर
परळी नांदे पार्वतिईश्वर ।।३।। धृ.म्ह. मुद्गल क्षेत्री गणपती पहा । गोळेग्रामि त्रिजगदाधीपा
गणेशवाडी शिवगणेश हा । नामलग्रामि आशापुरक । नवगणपती राजूर एक
पंचमुख गणपती वास्तव नाशिक । आसुरा हरी वासी त्र्यंबक । प्रवाल वासी सिद्धि विनायक
मढी विराजे बुद्धिविनायक । पुळे समुद्रा विकट विनायक । व्यास सरस्वती व्यास विनायक
माहुली नांदे मोद विनायक । पंढरपुरी नांदे व्यापक । अनागोंदी तो श्रीकल्पद्रुम
ब्रह्मपुरीचा तो श्रीगंगोत्तम । कोल्हापुरी तो लक्ष्मीप्रियतम् ।।४।। धृ.म्ह. कऱ्हाडक्षेत्री शिवप्रसादन
तारापुरी शनि गर्भ गजानन । सातारी मणिराज गजानन । पुरंदरी तो कश्यप नंदन
पुण्यग्रामी जयती गजानन । गणेशखिंडी पार्वती नंदन । लवळे ग्रामी सत्य सनातन
ऐसा अनंत रुपी विघ्नारी । भक्तजनांना साह्य करी ।।५।। (धृपद श्री मयूरपुरीपासून- मती
विवरापर्यंत म्हणावे )

श्रीमयूरेश्वर मयूरपुरी । भक्तराम मल्हारी प्रात:स्मरणी । मती विवरी स्मरण करी
श्री जयती गजानन चरणी समर्पण

जयति गजानन कसबा पुणे । अष्ट ब्राह्मण मूळ राहाणे । ठकार कानडे ढेरे ढेकणे
धर्माधिकारी शाळीग्राम गोऱ्हे । कवी पारखी पंडित येणे । नेऊरगांवकर आकुत माणके
आनंदी गोपाळ कानडे पथ । ग्रामसेवक सुनामा देत । जेष्ट पुत्र रामकृष्ण गोव्रती
कथाकिर्तनी फारच प्रीती । छपन्न नामे लिहून देती । ठकार शिरोळे अनगळ गेटी
कानडे गुरुजी सन्माने जाई पिढ्यापंचदश पुण्यात पाहीं । एकूण साठी लिखाण गाठीं
प्रसिद्ध व्हावे लागे पाठी । अष्टविनायक स्थानासाठी । लेखक तिवारी आले भेटी
एकशे आठ स्थाने गणेशपीठी । शाळिग्राम कानडे ओंकारहाती । छपन्न एकशे आठ लिहून देती
एक व एकविस आणिक आठ । छपन्न निराळे हे एकशे आठ । शोधून पाहू स्थानांचा घाट ।।

# अष्ठोत्तर शत श्रीगणेश क्षेत्र नामावली

( १०८ विनायकांची स्थाने )

(श्री गणेशपीठ बाबूराव शाळिग्राम यांच्या सौजन्याने) (अनुवादक र. ह. तिवारी)

मयुर क्षेत्रे भूस्वानंद चिन्तामणि स्थावरे ।
महागणपति तु मणिपुरस्थ, सिद्धिविनायक सिधिटेकषु ॥१॥
लवण्याद्रि, तु गिरजात्मजं, विघ्नेश्वरं तु ओझरे ।
बल्लाळेश्वरं च पालीषु, महढेवरद् विनायकम् ॥२॥
कुरुक्षेत्रे तु लम्बोदरं नैमिषारण्ये तु महोत्कटम् ।
वाराण्यास्यां गजमुखं, गयायां टंक धरिणम् ॥३॥
गंगाहृदये तु गांगेश. श्रीशैले तु विघ्नेश्वम् ।
जम्बकं दण्डकारण्ये लोकेशं हिमवद्‌गिरीम् ॥४॥

मलये हे मकुम्भकं तु विन्ध्याद्रि तु विघ्नेश्वरम् ।
विनायकं पुष्कर द्विपेषु, विघ्नेशं शलमके स्थितम् ॥५॥
विश्वरुपं इलावृत्ते हरिवर्षेच महोत्कटम् ।
सौराष्ट्रे वरदं नित्यं, काश्मिरे भीमरुपिणम् ॥६॥
उज्जनिन्यां तु लम्ब्रोष्ठ मालवे शूर्पकर्णकम् ।
महोदरंच लम्पायां बम्पायां शिखिवाहनम् ॥७॥
त्रिनेत्रं सिंहल द्वीपे श्वेतद्वीपे तु वामनम् ।
गोकर्णे गजवक्रंच, कान्यकुब्जे वराननम् ॥८॥

पाश हस्तं त्रिकुटे तु, पूजयेत सर्वं सिद्धिदम् ।
पद्म सनं कामरुपे, केदारे सर्वत: स्थितम् ॥९॥
सिन्धु सागरयोर्मध्ये विज्ञेयं मंत्र नाणकम् ।
हर्यक्षं यक्षभवने, कैलासें तु परमेश्वरम् ॥१०॥
महायोगं महेन्दे, तु महिवराहरुपिणम् ।
बलमग्नि गुहायांच पाटलेसिंहवाहनम् ॥११॥
मेरुपृष्ठे कामरुपं, नंदनं नन्दनेश्वरम् ।
पौन्ड्रं देशे तु रुद्रमुखं, जयं कल्याणि ग्रामके ॥१२॥

दुर्वायं यमुनातीरे, लवणं गंधमादने ।
भद्रवटे अमरेशं तु हस्तिनापुरे मोहनंषुच ॥१३॥

किष्किधा यामुग्रकेतु लंकायां बिभीषणम् ।
कलिंगे वरुणे चैव विध्यापादे महोत्कटम् ॥१४॥
अश्वथंच तरुष्केषु, चीने शत्रु क्षयावहम् ।
वज्रहस्ते कौलसेषु दक्षिणाद्रौ तु रोहितम् ॥१५॥

शुलोम्दुकरंचैव मध्य प्रदेशे प्रकीर्तितम् ।
अर्तांनां विघ्नहरणं गंगासागर संगमे ॥१६॥

REFBK-0025023

हृषिकेशे तु विकटं काशिक्षे तु ढुंढी विनायकम् ।
प्रयागं तु गणाध्यक्षं केदारे तु विकटाननम् ॥१७॥
अशोक विनायक काटमान्डेशु रक्त विनायक पशुपतिषुच ।
पूरीयां तु उच्छिष्ट सांकु तु सिद्धिविनायकम् ॥१८॥
नेगापिट्टम पंचमुखी तु भद्रकभागल पुरेषुंच ।
मुंडकरा तु नेपाळे तथा धौडी गणेंशतु ॥१९॥ (नेपाळमध्ये)
हालबिडेषु नृत्यगणेश विशाखापट्टन श्रीगणेशच ।
कृष्ण पिंग गजवक्र कन्नानुरेषु वक्रतुंडच ॥२०॥

आशा पुरेषुभ्रूशूंडी वरद: लक्षविनायक वेरुळेषुच ।
राजसदने तु वरण्यवरद: अदोषे शमिविघ्नेषुच ॥२१॥
शेषवरद: तु धराणिधरं पद्मालयेषु संस्थित: ।
राक्षसभुवने तु विज्ञानं महोत्कटे तु नासिके ॥२२॥
गंगामसले तु भालचन्द्रं. कश्यप्याश्रमे तु विनायकम् ।
शेंदुरवाडे तु सिंदुरांतकं, हेरम्बं नेगापट्टणेषुच ॥२३॥
पुळेषु तु लंबोदरं लिंबागणेश परळीषुच ।
श्वेत विनायक तु कुम्भ कोणे नर्मदायां षडभूजेषच ॥२४॥

द्विभुजंइडगुजेषु तथा गोकर्णेषुच ।
त्रिकुटेषु नान्देडे भुमराहे तु गजानन ॥२५॥
घाटीयालेषु चतुर्मुखं द्वारकेषु गणेशच ।
चंद्रसुर्यं विनायकं तु भटग्रामे स्तथा चोवरे ॥२६॥
एकदष्ट्रं तु पश्चिमादौ पूर्व देशे तु अपराजितम् ।
उत्तरे चारुवक्रंच वरिष्ठं त्रिपुरेषुच ॥२७॥

## भ्रम गेला देव सापडला ( समारोपाचे काव्य )

समय भरपूर दिला, सेवानिवृत्तीने मला ।
निश्चित काही करुया, शाई लेखणी मदतीला ।
जिवनी मी अनुभवला, पुस्तकात तो लिहीला ।
पुस्तका दिले नांव भ्रम गेला देव सापडला ।१।

जन्माला आले येतील, कधितरी ते जाणार ।
आशा ही अमर आहे, वाट तिची पाहाणार ।
माया मोह घरदार, नाही कधि सुटणार ।
जगले जे जिवनांत, दुःखी सुख भोगणार ।२।

जाळे भ्रमाचे मनात, जिवनी ते असणार ।
काही नको देवधर्म, नाटकी हे बोलणार ।
हौस मौज ईच्छा आशा, दैवी दुर्दैव येणार ।
सावधान सावधान, कोण कुणा म्हणणार ।३।

नशिब म्हणे दैवाला, देवधर्म विसरला ।
धर्म म्हणा कर्तव्याला, देव म्हणा दैवाला ।
एकमेका साह्यकरु, दांभिक बोलू लागला ।
झाली मजा आली सजा, विचार करु लागला ।४।

दैव सुदैव हे एकत्र, नाही कधि नांदणार ।
दैव प्रयत्न हे दोघे, एकत्र नाहीं येणार ।
दैवी देव असणार, कर्मात तो बसणार ।
नाटकी हे मुखवटे, भ्रमांत फिरविणार ।५।

बोधज्ञान थोडक्यांत, झाले पद्यात लिहून ।
अनुभव जिवनाचे, लिहीले काव्य गुंफून ।
वृत्त यमक ते नाही, काव्यबोध घ्या शोधून ।
विषय सर्व भ्रमांचे, घ्याल कधि समजून ।६।

चंद्र सूर्यादी कविने, काव्यात निसर्ग गुंफले ।
कळयांना फूलांच्या, त्याने दरवळून खुलविले ।
इश्क सदीरेच्या नादात, घुंघरु नाचविले ।
माझ्या शालेय कविता, गुरुस्थान ते ठरले ।७।

काव्यात गम्य असावे, करमणूक असावी ।
काव्यात बोध असावा, फसवणूक नसावी ।
हे शालेय कवि माझे, ते प्रथम गुरु झाले ।
अशाश्वत अंधश्रद्धा शाश्वत, मला कळाले ।८।

लेखन वाचन झाले, शुद्ध अशुद्ध पाहिले ।
शुद्ध तेवढे वाचले, अशुद्ध सोडून दिले ।
वाचून मनात सांगा, खरे काय समजले ।
वाचक श्रोते म्हणाले, पुस्तक छान लिहीले ।९।

पुस्तक ज्ञान भ्रमांचे, गद्यपद्यात लिहिले ।
वाचा वाचून समजा, भाग्य कुणाचे उद्रेले ।
शाई लेखणी थांबली, कामभ्रमांचे संपले ।
तात्या तिवारी म्हणाले, समारोप पूर्ण झाले ।१०।

### – ऋणपूर्तिचे दोन शब्द –

सर्व जिवनातील आजपर्यंतचे तसेच पुढे होणारे आणि शेष जन्म जन्मांतरीचे हे ऋण मानव प्राणी हा डोईवर वाहत असतो त्यापासून मुक्त होण्याची संधी मला या लिखाणामुळे प्राप्त झाली खरी. "भ्रम गेला देव सापडला" हे सत्य आहे, आता ऋणमुक्तीचा खरा मार्ग म्हणजे मोक्षप्राप्तीच ठरते व ती देवकृपेनेच लाभणारी आहे. या जन्मी मला देव सापडला तो पुढल्या जन्मी मला समजावा व मी तो पूजावा आणि भजावा त्यासाठी या पुस्तकाघरीच माझा पुनर्जन्म व्हावा आणि हा लाभ सर्व माझे ऋणकरी व प्राणीमात्रास लाभावा हीच श्री मयूरेश चरणी प्रार्थना सर्वंच जिवप्राणी एकमेकांचे ऋणकरीच असतात. व्यवहार म्हणून मला साह्य करणारी सर्व मंडळी तसेच मुद्रण आर्ट कलाकार सर्व मंडळीचे आभार धन्यवाद.

|| श्री गणराज समर्थ ||

## षष्टद्वी पूर्तिचा ज्ञानमोदक (समारोपाचे काव्य)

जिवनांत फिरलो मी, लहान थोर सर्वांत ।
अनुभवाचे हे ज्ञान, लिहिले गद्य पद्यात ।
स्वार्थ नसे द्रव्यलोभ, हेतु नसे हा लौकीक ।
अहो भाग्य, अहो भाग्य चाखा हा ज्ञान मोदक ।१।

दु:खी कुष्टी हे जिवन, रोगी भोगी ते मानव ।
सुखी नसतो कुणिही, आधिव्याधि रंकराव ।
ख्याली खुशाली मौज, दैवी असते दुर्दैव ।
अहो भाग्य, अहो भाग्य चाखा हा ज्ञान मोदक ।२।

दैव सुदैव हातात, कर्म घडे जे क्रियेत ।
तेच येते भाली दैव, लिहिले भाग्यरेखेत ।
मानव हा पराधीन, जिवन त्याचे दैवत ।
अहो भाग्य, अहो भाग्य चाखा हा ज्ञान मोदक ।३।

ध्यातो अध्यात्म मनांत, देवधर्म जात पात ।
जगती सर्व मानव, जन्म मृत्यूच्या फेऱ्यात ।
तुझे माझे हे उगींच, परमार्थ नसे त्यात ।
अहो भाग्य, अहो भाग्य चाखा हा ज्ञान मोदक ।४।

ज्ञानी लपले अज्ञान, ज्ञान असोवा विज्ञान ।
भ्रम निरासाचे ज्ञान, गद्य पद्याचे लिखाण ।
षष्टद्वी पूर्तिचीं भेट, प्रकाशले हे पुस्तक ।
अहो भाग्य, अहो भाग्य चाखा हा ज्ञान मोदक ।५।

षष्टदीचे लाडू पेढे, घास भक्षणी हा मिष्ट ।
देणें घेणे हे प्रेझेंट, शिष्टाचार हा संपुष्ट ।
ज्ञानान्न नसे द्रव्यात, सगुणात निर्गुण श्रेष्ठ ।
तिवारी साधले उद्दिष्ट, देव सापडला हा जेष्ठ ।६।

### समर्पण

मातृ पितृ देवगुरु स्मरुन ।
श्रीचरणीं करतो समर्पण ।
श्रोता वक्ता श्रीगुरुगणनाथ ।
मी अजाण असा आहे बालक ॥१॥

### अभिप्राय

लिखाणाचे कौतुक उगीच नसावे ।
अनुभवाचे लिखाण वाचून पहावे ।
ज्ञानाने माझे अज्ञान दूर करावे ।
अज्ञानाचे अभिप्राय मात्र पाठवा ॥४॥

### – आभार –

प्रथम वंदन करतो श्री गणनाथ ।
मातृपितृ देव गुरुंची लाभली साथ ।
आप्त ईष्ट मित्रांनी प्रसंगी दिला हात ।
करता करविता तोच गुरु गणनाथ ।१।

ज्ञात अज्ञात ज्यांनी केला परोपकार ।
नांव घेणें सर्वांचे कसे जमणार ।
क्षमा अंगी मोठेपण ते साधणार ।
श्री चरणी मी त्यांचे शुभ चिंतणार ।१।

श्री चरणी समर्पण – श्री गजानन जय गजानन
शेष श्री गणेश शरणम् – जय गणेश गुरु अभिवादन

।। श्रीगणराज समर्थं ।।

वक्रतुंड महाकाय सूर्य कोटी समप्रभ
निर्विघ्नं कुरूमेदेव सर्वकार्येषु सर्वदा




- श्री गणेश -
आईस्क्रिम ॲण्ड कोल्ड्रिंक्स
स्टॉकिस्ट :- महाराष्ट्र कोल्ड्रिंक्स
अहिल्याबाई चौक, कल्याण.
फोन नं. ४७९५



लेखक मुद्रक प्रकाशक :- रघुनाथ हरिप्रसाद तिवारी, दत्त आळी कल्याण.

मुद्रणस्थळ :- प्रगती मुद्रण, बदलापूर, व कुणाल प्रिन्टर्स, कल्याण.